

MR
891.499 3
M 726 S

MR
891.499 3
M 726 S

# सात शिखरे

अख्तर मुहिउद्दीन

# सात शिखरे

(काश्मिरी कथा)

लेखक

**अख्तर मुहिउद्दीन**

अनुवादक

**दत्ता भगत**

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली

*Sat Shikhare* (सात शिखरे) : Marathi translation by Datta Bhagat of Akhtar Mohiuddin's Kashmiri stories *Sat Sangar*, Sahitya Akademi, New Delhi, (1982)
SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs.10·00

Library IIAS, Shimla
MR 891.499 3 M 726 S
00117043

© साहित्य अकादेमी, १९८२
प्रथम आवृत्ती १९८२

MR
891.4993
M 726 S

प्रकाशक :
साहित्य अकादेमी
रवीन्द्र भवन,
३५, फिरोझशाह रोड,
नवी दिल्ली ११० ००१

Indian I... ...nce
117043
9/12/04

मुद्रक :
संजीव मुद्रणालय,
४६९, सदाशिव पेठ,
पंताचा गोट,
पुणे ४११ ०३०

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs.10·00

## लेखकाचे दोन शब्द

जीवनाची आवडती आणि लाडकी कन्यका कला जोपर्यंत जीवनाचे स्तनपान घेत राहील तोपर्यंतच ती जिवंत राहू शकेल. जीवनापासून पृथक झाल्यामुळे कला निर्जीव आणि निष्प्राण होते. प्रत्येक कलावंत हा जीवनाच्या निरोगी शरीराचा एक अविभाज्य घटक असतो म्हणूनच तो कलेला जिवंत ठेवण्यासाठी जीवनाचे स्तन्य कलेला मिळेल ह्याची काळजी घेत असतो. जीवनाची स्पंदने जिथे असतील, जिच्या मुखावर निगूढ आणि सुकुमार बालकाचे हास्य विलसत असेल तीच महान कलाकृती होय. ज्या कलाकृतीत ह्याचा अभाव असेल ती निर्जीव आणि निष्प्रभ कलाकृती होय.

माझ्या कलाकतींचं मोजमाप ह्याच कसोटीवर व्हायला हवं. जर ह्या कसोटीवर ती उतरत नसेल तर तिला जाळून टाकायला हरकत नाही, एवढंच मला सांगावंसं वाटतं.

श्रीनगर — अख्तर मुहिउद्दीन

१ नोव्हें. १९५५

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | सागुतीची हंडी | १ |
| २ | लाल सलवार | ६ |
| ३ | असंही होऊ शकतं ! | १२ |
| ४ | बैल आणि बैल | २० |
| ५ | गुंता झालेल्या केसांची मुलगी | २५ |
| ६ | सुतळीचा तोडा | ३१ |
| ७ | कासवं | ४० |

# सागुतीची हंडी

एकाएकी ब्रीस्तू चांभार उठला आणि अश्मीचं डोकं पायताणानं ताडताड बडवत सुटला. इतकंच नाही तर तिचा बुचडा धरून त्यानं साऱ्या घरभर तिला फरफटलं. चुलीतल्या आचेमुळं तिच्या नेसूनं पेट घेतला नाही ही देवाजीची दया, नाहीतर डोक्यापास्नं पायापर्यंत पार होरपळलीच असती बिचारी. चुलीवर ठेवलेल्या हंडीत सागूती रटरटत होती

अश्मी बोंवलत ओरडली, " कुणी तरी धावा हो ! वाचवा ! हाय रे देवा, मुड्यानं मारलं हो ! खानाखराब हो मुड्याचा ! "

" मुडदा बसो तुझ्या खानदानीचा असंल तिथं ! " ब्रीस्तू चांभार दोन्ही बाजूला पचकन थुंकत बोलला, " माझा मुडदा बसवतेस तू ? रांडे तू...... "

" माझ्या खानदानीच्या मागं काह्यला पडतावं ? " अश्मी अजून जोरजोरात ओरडू लागली, " त्यानी काय तुमची चूल बंद केली ? "

चुलीचा उल्लेख येताच ब्रीस्तूला हंडीची आठवण झाली. मन उद्विग्न झालं. आज इतक्या दिवसांनंतर सागूती खावी वाटली तर ह्या कैदासणीनं सगळी चव घालवली. तो अश्मीवर पुन्हा गरजला,

" रांडे, दिस निगायच्या आत न्हाई तुला सोडचिट्टी दिली तर असली बापाच्या बीयाचा न्हवं "

" आरं, जा, जा, खेटराला सांग मह्या ? " भुवया ताणून हातवारे करीत अश्मी बोलू लागली, " मी लोकायची उष्टी-खरकटी काढून पोट भरीन. लंगडी लुळी न्हाई मी काई. "

गोंधळ ऐकून सारी आळी गोळा झाली. सलाम डोम, गुल बदमाश, नूरकमल आळीतील म्हातारी कोतारी, बायकामुलं, सगळेच गोळा झाले. वेडी खोरशी देखील ऊर बडवीत पोचली आणि म्हणू लागली,

" अरे ब्रीस्तू, काय झालं रं बाबा तुला ? बिच्यारीचं डोस्कं पार रक्तबंबाळ करून टाकलंस ? तुला काइ दयामाया हाय का न्हाई ? "

अश्मीला तिच्या बोलण्यानं थोडा धीर आला. ती बोलली. " कशाची नशा ह्येच्या डोस्क्यात चढली काय म्हाइत ! त्याच्याबिगर दुसरं कुणी पंचवीस टिकल्या कमवल्याच न्हाइत जनू ! दिस निघताच भावास्नी सांगून डोस्क्यातली नशा पार उतरून टाकीन म्हंजे समजंल. सात भावामंधी एकली भइन हाय मी, सात भावात .. ! "

ब्रीस्तू चांभारावर ह्या धमकीचा काही प्रभाव पडला नाही. उलट तो बोटं नाचवून तिला खिजवू लागला.

" अरे भई, आखीर मामला काय हाय ? " नूरकमाल शहाण्यासुरत्या माण-सारखा विचारू लागला, " आमाला काय सांगशील का न्हाई ? अश्मी, तू चूप बस बघू ! "

" म्या चूप बसू ? म्या तर साऱ्या दुनियेत डंका वाजवून फटफजिती करीन मुड्याची ! "

" अग जा, जा रांडे ! " ख्रीस्तू चांभार पुन्हा भडकून उठला. तिला मारायला त्यानं पुन्हा पायताण उचललं. परंतु नूरकमाल आणि गुलबदमाश मध्ये पडले आणि त्याला खाली बसवला.

ख्रीस्तू धपापू लागला. त्याचा चेहरा लालपिवळा झाला. सर्व रोमारोमातून घाम निथळू लागला. हातपाय कापू लागले. रागाने तो दात–ओठ खाऊ लागला. दिवा जर देवळीत नसता तर पायाखाली त्याचा केव्हाच चकनाचूर झाला असता. हुक्क्याची नळी गायब झाली होती. चिलमीच्या पार ठिकऱ्या उडाल्या होत्या. लहानसहान पोरटयांनी एकच गिल्ला केला होता. कुणीच कोणाचं बोलणं ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हतं. फक्त ऐकायला येत होती ती ख्रीस्तूच्या शिव्यांची लाखोली आणि हातावारे करून शिव्याशाप देणाऱ्या अश्मीच्या तोंडची मुक्ताफळं !

शेवटी ख्रीस्तू नूरकमालला उद्देशून म्हणाला, " मर्दा, आता तूच मह्या तोंडावर थूक आणि म्हण की, आबे ओ नामुसलमान, तू जे काय सांगतूस ते समदं खोटं हाय ? "

" अबे पन काय सांगशील का न्हाय ?" मिशीवर ताव देत गुलबदमाश म्हणाला. कदाचित देवळीत ठेवलेल्या दिव्याच्या तेलकट काजळीने तो मिशीला पीळ भरत असावा. तर काय, नेमकं तो हेच तर करत होता; नाहीतर देवळीजवळ उभं राह्यचं कारणच काय होतं त्याला. सगळयांसारखं त्यालाही खाली बसता आलं असतं.

" काय बोलू बा ! खिन्न नजरेनं ख्रीस्तू ओशाळवाणं हसत बोलला, " आताच थोडया येळापूर्वी मला पगार भेटला. तुमाला सांगीतलंच व्हतं ना, सुलतान खाटका-कडून सागुती आनली म्हून ? "

" व्हय, व्हय ! " गुलबदमाशानं साक्ष दिली.

" तुझ्या तोंडात साखर पडो ! रुपयं मिळालं समदं धरून पंचवीस. जमादार सायब तिथंच उभं व्हते. म्हून त्याह्यला दिलं दोन. मनात आलं, कमेटीच्या मागल्या अंगानं भाईर पडून पोलीस लायनीन तशीलहफिसाच्या मागून थेट घरी जावावं. कारन तिथं गपफार दुकानदाराचे धा रुपयं चुकवायचं व्हते. म्हइनाभराची उधारी त्याच्याकडं हाय न्हवं का ? "

" खरं सांगायचं म्हनजे "... नूरकमाल सांगू लागला, " माझा बी हाच इचार व्हता की, या म्हइन्यात त्याला काईबी न्हाइ देयाचं, मागल्या अंगानंच पळून

जायचं. बघता येईल म्होरच्या म्होरं म्हइनाभर काय करतो ते ! "

" देव तुम्हं भलं करो ! "

" पर काय करू यार, वो सुअर की अवलाद, कमेटी हफिसच्या व्हरांड्यात उभा. जसा म्या पगार घेतला की त्यानं मागून आवाज दिला, " कमाल, अरे भई नूरकमाल ! माझा हिशोब तर चुकता कर ! "

" देव भलं करो तुम्हं, " ख्रीस्तू चांभाराची गोष्ट खरी शाबीत होत होती म्हणून तो खुशालत होता.

" तर मंग म्या काय डोळं फोडून घेऊ, ना म्हणून ? म्या म्हनलो " घे बाबा हे तुझे पैसे. "

" देवाची दया, " ख्रीस्तू मध्येच त्याचं वाक्य तोडत म्हणाला, " खुदा कसम मला बी अशी आसचं धरलंन त्यानं. मंग म्या बी काढले धा रुपये आन ठेवलं त्येच्या हातात, काय करनार ? म्हइनाभर तर त्येच्याच म्होरं हात पसरावा लागतो. आखीर त्यानं चोरी थोडीच केली व्हती ? "

सगळ्यांनीच त्याच्या ' हो 'ला ' हो ' केली तसा अश्मीचा जीव जळू लागला. तिचं काही चालतं तर तिनं ख्रीस्तूचं काळीज काढून चांगलं भाजलं असतं. तिचं डोकं गरगरू लागलं. फिरन[1]च्या बाहीची उशी करून ती तिथेच आडवी झाली. ती उसासू लागली. डोळ्याला आसवांची धार लागली.

" तर ह्ये झाले धा रुपयं ! " ख्रीस्तू उंच आवाजात बोलला, " सात रुपयं नूर पठाणाचं मागल्या म्हइन्यातलं देनं व्हतं. "

" मला सांगतूस व्हय ? म्या त्याला म्हनलं, हाजी साएब, या म्हइन्यात मला जरा तंगी हाय पैशाची. तवा दोनचार शिव्या हासडल्या आन म्हनला, ठिक हाय, म्होरल्या म्हइन्यात दे जा ! "

" पर माझ्याच वक्ताला काय झालं काय म्हाईत ! मागंच पडला भडमुंज्या. खरं म्हनजे तो आदमी नेक जरूर हाय. आन चोरी थोडीच केली व्हती त्यानं ? दोन म्हइनं झालं त्येच्याकडून सात रुपयं घिऊन."

एकाएकी दिवा देवळीतून खाली पडला आणि सगळीकडे गपकन अंधार झाला. काहीजण उठून उभे राहिले. तर काही बसले. अश्मीला सगळ्यांनी आगपेटी विचारली. तर अश्मी एकदम ढिम्म. काही बोलेना की चालेना. नुसती अश्रू ढाळतेय. शेवटी वेडी खोरशीच उठली आणि कांगडी[2]तले दोन चार कोळसे सुलगावून तिनं दिवा लावला.

---

१. एक प्रकारचा घोळदार सैल असा काश्मिरी पोशाख.

२. शरीराला सतत उब मिळावी ह्यासाठी गळयात अडकवून ठेवायची काश्मिरी लोकांची शेगडी.

"अरे गुलवदमाश कुठं पळाला ?" नबिर शेखचा पोरगा ओरडला. पण कुणी त्याच्याकडे लक्ष दिलं नाही. ब्रीस्तूनं आपलं बोलणं चालूच ठेवलं– "तर बघा झाले सतरा. न्हाइ न्हाइ एकोणीस. दोन जमादाराला, द्या गफ्फार दुकानदाराला आन सात...काय वरं नाव–"

"नूर पठाणाला." रसूलनं आठवण करून दिली.

"देव भलं करो तुम्हं," ब्रीस्तू म्हणाला, "तर समदं झालं एकोणीस रुपयं. वरल्यावर खर्च झाले म्हना ना ! आता तुमीच सांगा म्या काय खाल्ले ह्यातून ? हां हिच्या लाडक्या लेकीसाठी म्या फिरनचा जोडा न्हाइ आनला !"

"जुव्यासाठी पैसं नको तुमाला ? उठा, येईल तो थोटा साविर !"

"त्याचं नाव कशाला घेतीस ?" ब्रीस्तूचा पारा चढला, "हिला गप न्हायला सांगा. पहाट झाल्यावर करतो फैसला हिचा "

"आरं बाबा बाकीचं सहा रुपयं कुठं हाइत ?" नूरकमालनं विचारलं.

इतक्यात सुलतान डोम हुक्क्याची नळी ओठानं सांभाळत तिथं येऊन ठेपला.

"शंभर वर्स आयुष्य हाय बाबा तुला !" नूरकमालच्या तोंडून दुवा बाहेर पडली. सुलतान डोमानं हुक्का ब्रीस्तूसमोर ठेवला आणि म्हणाला, "हं. हान मर्दा एक दम. आजच त्या जब्बारनं अमरिकातनं आनला बघ तमाखू. लई जोरदार असतो त्येचा तमाखू !"

ब्रीस्तू एक दम मारून पुढं बोलू लागला, "उरलं पाच रुपयं. तीन आताच ह्या अवदसेनं खोरशीला दिले. उधार घेतले व्हते तिच्याकडून.

"खरं हाय" जवळच बसलेल्या खोरशीनं ग्वाही दिली, 'खरं हाय. खोटं कशाला बोलू ? एक दिस मरायचं त हाय !"

"आता आलं ना ध्यानात," ब्रीस्तू खोरशीच्या बोलण्यावर खूष झाला आणि म्हणाला, "न्हायलं दोन रुपयं. तर त्यातल्या एक रुपयाचे बकऱ्याचे खूर घेतले." हे म्हणताना त्याची नजर सहज चुलीकडे गेली आणि तो जवळजवळ ओरडलाच, "अरे इथली हंडी कोन घेऊन गेला ?"

त्याच्या ह्या वाक्यानं अश्मी खडबडून उठली. चुलीच्या आगेमागे तिची नजर भिरभिरू लागली. सगळ्या देवळ्या बघितल्या. घरातला कोपरा न् कोपरा धुंडाळला. जणू एखादी सुई हरवलीय. सगळ्यांचे चेहरे उतरले. काही तर ह्या भयानं घाबरले की चोरीचा आळ त्यांच्यावर तर येणार नाही ना !

ब्रीस्तू चांभाराचं डोकं चक्रावून गेलं. त्याला हे समजेना की चुलीवरची हंडी कोण्या हडळीनं नेली. सगळं भांडण तो क्षणात विसरला. अश्मीला म्हणाला, "चुलीवरच व्हतं ना ?" सारं घर धुंडाळून अश्मी थकली होती. ती म्हणाली, "तुमी न्हाइ बघितली ? हिथंच तर व्हती. कुनाचा मुडदा बसवला रं देवा. आमची हंडी कोनं नेली ?"

नूरकमाल देखील विचारात पडला की ही मस्करी कुणी केली असावी. असं कोण करू शकेल वरं ? आणि एकाएकी तो ओरडला, "त्या गुलवदमाशाला कुणी तरी वोलवा वरं !"

नवीर शेखचा पोरगा रसूलला म्हणाला, "मला अदुगरच शक व्हता त्येच्या-वर."

तो असं म्हणताच सगळेजण गुलवदमाशाच्या घराकडे धावले. वाहेर एकच गोंधळ सुरू झाला. गुलवदमाशाची आई घराच्या खिडकीतून तोंड काढून आणा-भाका घ्यायला लागली की, सागुतीची हंडी गुलनं नाही चोरली. पण अश्मीला तिच्यावर मुळीच विश्वास नव्हता. ती आणखी जोरजोरात हातवारे करीत तिला शिव्याशाप देऊ लागली, "अग आमच्या हंडीतली न्हाइ, तू तुझ्या लेकराची सागुती खाशील !"

गुलवदमाश घरात चुपचाप वसला होता. ओरडून ओरडून आणि शिव्यांची लाखोली वाहून ख्रीस्तू चांभाराच्या तोंडाला फेस येत होता. राहून राहून खुरांच्या रश्शाची मजा आणि चव त्याला आठवत होती. शेवटी तो थकला. आणि अश्मीच्या हाताला धरून घराकडे वळला.

"गळ्यावर सुरी फिरो मुडद्याच्या. हडळ खावो त्याला. देवाच्या मनात आलं तर पुन्हा मिळंल आमाला. पर यायलाच देवधरम न्हानार न्हाई."

रात्री जव्हा सगळेच आपापल्या शेजेवर झोपले होते, तेव्हा ख्रीस्तू चांभार अश्मीच्या डोक्याला गरम गरम हळदीचा लेप लावत होता. आणि म्हणत होता, "म्या तर तुला अदुगरच सांगितलं व्हतं, घरात असलं झेंगट न्हाई करायचं म्हून. त्यामुळं घरात दळिदर येतंय !" अश्मी म्हणाली, "वघा ना, मुडद्यानं वघता वघता शाप केली हंडी ! मनात येतंय वकऱ्याऐवजी ह्यालाच तुमच्या म्होरं वळी द्यावं."

# लाल सलवार

नविर शालने सत्तरी ओलांडली होती. अगदी सुरुवातीपासूनच हा रफूगारीचा व्यवसाय त्यानं स्वीकारला होता– आणि आतापर्यंत तो तेच करीत आला होता. झेलमच्या किनाऱ्यावर दोन दालनं असलेली तीन मजली लाकडी झोपडी होती त्याची. इथंच एका दालनात बसल्या बसल्या तो नाकावर जाड भिंगाचा चश्मा ठेवून काम करीत असे आणि रंगात येऊन थेट पंचम लावून गात असे–

प्रेम प्रीती की मदिरा मुझे पिला गया ।
आह रातकी प्याली में ये कौन सखी ।

आयुष्यातील जास्तीत जास्त वर्षं त्यानं ह्याच दालनात बसल्या बसल्या घालविली होती. उभ्या आयुष्यात त्याला दोनच गाणी तेवढी पाठ झाली होती. त्यापैकी एक होतं ' प्रेम प्रीती की मदिरा–' आणि दुसऱ्या गीताच्या ओळी होत्या–

आङ् के फूलोंसा मोहक–मोहक रूप पिया का ।
जान जायगा अग-जग करना प्रकट न भाव हिया का ।।

लहानपणापासूनच त्याला तोतरं बोलायची खोड होती. तोंडाचं पार बोळकं झाल्यावर तर हा तोतरेपणा आणखी वाढला होता. लहान पोरासारखं तोतरं तोतरं बोलायचा नविर शाल. चेहऱ्यावर पांढऱ्याशुभ्र बर्फासारखी वीतभर दाढी होती. असं वाटायचं, चरख्यावर कातलेल्या मऊमुलायम लोकरीच्या पेळूतलेच पांढरे धागे त्याच्या दाढीवर डकवले असावेत. त्याचे हात जरूर थरथरत पण काम मात्र अव्याहत चालूच असे. काहीही का असेना रोजची रोजी–रोटी तो कमावीत असे एवढे खरे. गिऱ्हाइकंही त्याच्या कामाची असं समजून कदर करीत की, चला म्हातारा जुना कारागीर आहे आणि शेवटी जुनं ते सोनं ! त्याच्यासमोर नव्याची काय बिशाद !

नविर शालला अलम दुनियेतील फक्त दोनच गोष्टी अत्यंत प्रिय होत्या. एक त्याची झोपडी आणि दुसरी त्याची पत्नी– खोतनबीबी. दररोज रात्री ती म्हाताऱ्याचे पाय चेपायची, उनउन वरणभात समोर ठेवायची आणि वेळोवेळी चिलीम भरून द्यायची. नविर शाल जेव्हा दालनात बसल्या बसल्या लहान मुलासारखा गीत गुणगुणायचा आणि त्याची सुई रफल[१]च्या शालीतून इकडे तिकडे जायची– जणू त्याच्या जखमेवर मलम लावतेय– तेव्हा ती त्याच्यासमोर बसून राही. आणि पश्मीनची लोकर साफ करीत बसे किंवा चरख्यावर कातत बसे. नविर शाल तिला नेहमी म्हणायचा,

---

१. रफल : पांघरायचे गरम वस्त्र, शाल.

" हे बघ, मी तुझा उस्ताद अन् तू माझी शागीर्द."

खोतनबीबी वळून म्हणायची, " का ? तुम्हीच का उस्ताद ? अन मीच का शागीर्द ? शागीर्द तुम्ही आहात ! "

खोतनबीबीच्या तोंडात एकच दात शिल्लक उरला होता. वरच्या कवळीतला समोरचा. खालचा ओठ थोडा आत मुडपलेला होता. आणि हा एकच दात तेवढा खिळ्यासारखा बाहेर डोकावत होता. सुरकुत्यांनी भरलेला तिचा चेहरा चिंबलेल्या शलजमासारखा दिसत होता. मळकट पागोटयाच्या पदराला कायम पीळ पडलेला असावा तसे तिचे केस दिसत होते. पोरांना जन्म देऊन तिला वीस वर्षं उलटली होती. तिने दहा पोरांना जन्म दिला होता ! देवाचीच कृपा होती तिच्यावर ! परंतु दुर्दैवाने सगळ्यात मोठी आणि मधली मुलगी सोडली तर कुणीच जगलं नव्हतं. मोठ्या मुलीचं घर तर सुनाबाळांनी भरलेलं होतं. आणि मधलीनंही सासू मरताच घरातली सगळी जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलली होती. लाकडाच्या ह्या घरात आता फक्त म्हातारा अन् म्हातारीच काय ते शिल्लक होते. संसाराची गाडी हळूहळू का होईना पण ठीक चालली होती. कुठल्याच मोठ्या संकटाशी त्यांना सामना करावा लागला नव्हता. मुलीच्या लग्नासाठी इकडून तिकडून घेतलेलं कर्जही त्यांनी फेडून टाकलं होतं. खोतनबीबीच्या उरी फक्त एकच शल्य होतं, तिचा कुठलाच पोरगा जिवंत राहिला नव्हता. ती विचार करायची, तिच्या पोटच्या गोळ्यांना कोणती अवदसा ओढून नेत असे काय माहीत. साऱ्या गल्ली-बोळात अफवा होती की नबिरशालजवळ बरेच धन आहे. काही नाही म्हटलं तरी किमान दोन हजार तर नक्कीच असतील. परंतु खरं तेवढं देवालाच माहीत होतं. बिचाऱ्याचं रोजचं पोट हातावर होतं.

नाकावर जाडया भिंगाचा चष्मा ठेवून नबिरशाल रोजच्यासारखाच आजही रफलच्या शालीला रफू करीत होता आणि आपल्या आवडत्या गाण्याच्या ओळी गुणगुणत होता–

प्रेम प्रीतीकी मदिरा मुझे पिला गया ।

आह रात की प्याली में यह कौन सखी ।।

खोतनबीबी जवळच बसून चरख्यावर लोकर कातीत होती. आणि मनातल्या मनात त्याच्या सुरात सूर मिसळून गात होती. झेलमचं पाणी गढूळ झालं होतं. कदाचित तिकडे दूर दक्षिणेकडच्या घाटात पाऊस पडला असावा. परंतु शहरातील पावसाळा संपून बरेच दिवस झाले होते. आणि आता भयंकर उकडत होतं. अशात काम करायला खरं म्हणजे त्याचं मन लागत नव्हतं. परंतु ज्याला ह्या हाताशिवाय दुसरा आधारच नव्हता त्यानं दुसरं करावं तरी काय ? काम न करून जाणार कुठं ? खाणार काय ? नबिरशालला आज उमजून चुकलं होतं की तो दोऱ्यानं रफू करीत नाही तर स्वतःच्या रक्ताचं पाणी करून लोकांचे कपडे रफू करतोय.

घामानं तो डवरला होता. आणि गुडघ्यावर ठेवलेली रफलची शाल त्याला नकोशी झाली होती. आधीच उकाडा आणि त्यात ही विलामत ! पण करतो काय ? काम केल्याशिवाय गुजराणही होणं शक्य नव्हतं. मनातून उकाड्याचा विचार काढून टाकण्यासाठी आणि नेहमीच्याच सवयीप्रमाणं तो आवाज पंचमात चढवून गात होता.–

आड़ू के फूलोंसा मोहक ..

देवा–देवा करता एका शालीचं रफूकाम शेवटी पूर्ण झालं. फक्त बाहेर लोंबलेल्या दशा तेवढ्या कापायच्या शिल्लक उरल्या. त्यानं आजुबाजूला चाचपडून पाहिलं, परंतु कात्री हाती लागेना, शेवटी त्यानं बायकोलाच विचारलं–

"कात्री कुठंय ?"

"मी कुठं तरी उचलून ठेवलीय." तिनं उत्तर दिलं.

"आण बघू, मला हवीय !"

खोतनबीबीला उठायचं जीवावर आलं होतं. तिच्या गुडघ्याला सांधेदुखीचा त्रास होता आणि उठवस केल्यामुळे तिला हा त्रास नेहमीच व्हायचा. तिच्या मनात येतं तर ती आयुष्यभर एकाच ठिकाणी बसून राहती. पण घरधन्याचं म्हणणं ती तरी कसं टाळणार ? का कूं करीत ती उठली. अन् कात्री शोधू लागली. तिने देवळीत पाहिलं पण तिथं भेटेना. पत्र्याच्या लहान डब्यातही शोधलं पण तिथंही सापडेना. तिकडे नबिरशाल घायकुतीला आला होता. पटापट काम आवरून तंगड्या पसरण्याचा त्याचा बेत होता. त्यानं गोंधळ घालायला सुरुवात केली.

"अग लवकर शोध !"

"तेच तर करतेय." खोतनबीबीनं उत्तर दिलं आणि देवळीतून कपड्याचं एक जुनं गाठोडं खाली काढलं. गाठोड्यात काही जुनी बाळोती आणि लहान मुलांचे जुने कपडे होते. मुलं तर वाचली नाहीत. कपडे तेवढे राह्यले. खोतनबीबीच्या उरी ही वाव राहून राहून खुपू लागली. तिच्या मनात विचारांची दाटी झाली होती. गोजीरवाण्या बाळांना जन्म दिला होता तिनं. पण कोणा अवदसेनं त्यांना ओढून नेलं कुणास ठाऊक ! एक एक करत तिला आपल्या सर्वच गेल्या बाळांची आठवण येऊ लागली. तिला वाटलं, आपल्या आटलेल्या स्तनांना पुन्हा पान्हा फुटतोय. तशी तिची नजर एका लाल सलवारीवर गेली. तिचं काळीज लख्खकन हललं. ही सल्वार तिनं लग्नाच्या दिवशी घातली होती. लग्नातल्या कपड्यांपैकी ही एवढीच काय ती शिल्लक होती. ती आपल्या तारुण्याच्या मधूर स्मृतीत हरवून गेली.

खोतनबीबी आपल्याशीच लाजली. नवऱ्याची नजर सलवारीवर पडू नये म्हणून तिनं खूप प्रयत्न केला. परंतु तिचा लाल रंगच मुळी असा होता की काही केल्या लपवता येत नव्हता, बरोबर नजर तिथेच खिळून राह्यची. लाजलाजून खोतनबीबीच्या मुखावर नवथर तरुणीसारखा आरक्त लालिमा दिसू लागला. तिच्या

हृदयाचे ठोके जलद पडू लागले. तिला वाटलं, तिचं नुकतंच लग्न झालंय. ती नववधू आहे आणि नविरशाल तिचा तरुण उमदा नवरा. सासूबाई आताच खोलीतनं बाहेर पडल्यायत आणि नविरशालबरोबर ही तिची पहिलीच रात्र आहे. ती डोळ्याच्या कोपऱ्यातून नविरशालकडे पाहतेय. अरे, तो तर तिलाच निरखून बघतोय, गालातल्या गालात हसत हळूच गुणगुणतोय,–

आडू के फूलोंसा मोहक...

खोतनला क्षणभर वाटलं की, खरंच नविरशाल नवतरुण आहे अंगात अलपाकची फिरन घालून खांद्यावर दुशाला आणि डोक्यावर नऊशे सत्त्यांशी नंबरच्या मलमलीचा फेटा बांधून येतोय तो. नुकताच घोड्यावरून उतरलेला नवरदेव आहे तो. आणि ती मान खाली घालून बसलेली नववधू. बावळट गोड विचार तिच्या मनाला गुदगुल्या करू लागले– 'हाय रे देवा, आता तो माझ्याशी बोलेल– काय उत्तर देऊ बरं त्याला. इश्श ! मला तर बाई लाजच वाटतेय !"

नविर शाल बोलत होता...खोतनबीबी आपल्या कानांनी ऐकत होती –

" उठ ना, नेस ती सलवार " ती लाजली आणि जागीच शांत बसून राहिली. बोलणार काय ? नविरशाल पुन्हा म्हणाला, " नेसतेस ना ?" त्यानं गुडघ्यावरची रफलची शाल फेकून दिली– (किंवा खांद्यावरचा दुशाला बाजूला सारला) आणि खोतनबीबीजवळ जात पुन्हा आग्रह केला, " नेस ना ती सलवार. "

" तुमचं डोकं तर फिरलं नाही ना ?"

" का ! डोक्याला काय झालंय ?"

खोतनबीबी शांत आणि स्थिर बसून राहिली. आता उठायचं तरी कसं ! उठायचं तर दूरच राहिलं, तिला आता डोकंही वर करायचा धीर होईना.

" ठीकाय्, नको नेसूस " नबिरशाल म्हणाला आणि बाहेर निघून गेला. खोतन बीबीला थोडं हायसं वाटलं. ती धडपडत उठली आणि गाठोडं बांधू लागली. लाल सलवारीकडं तिनं लोभसवाणी नजर टाकली. तिच्या मनात कैकदा आलं की नेसून पहावी पण तिची तिलाच लाज वाटली. शेवटी गाठोड्याच्या तळाशी तिला ठेवून गाठोडं देवळीच्या एका कोपऱ्यात ठेवून दिलं. तिनं इकडे तिकडं बघितलं. अरे ! नविरशाल कुठं गेला ? अचानक हा कुठं गायब झाला. खोतनबीबीला पश्चात्ताप झाला. शेवटी तो खोलीच्या बाहेर का गेला ? थोडासा धाक दाखवला असता तर नेसले असते मी सलवार. लाजत लाजत ती विचार करू लागली.

बऱ्याच वेळानं दार उघडल्याचा आवाज झाला आणि गुणगुणत नबिरशाल आत आला...

'आडू के फूलों सा मोहक '...

खोतनबीबी पुन्हा एकदा लाजून चूर होत खाली बसली. का कुणास ठाऊक राहून राहून तिला लाल सलवारीची आठवण येत होती. आणि तिच्या गालावर

लालिमा पसरत होती. ती ह्या विचारात पडली की नबिरशालनं पुन्हा सलवार घालण्याचा आग्रह केला तर ती त्याचं म्हणणं ऐकेल की नाही. हां, हां ती जरूर ऐकेल. पण छे, कसं शक्य आहे हे ? ती तर लाजेनं पार चूर होईल. नबिरशाल गुणगुणतच पायऱ्या चढला. आत येऊन पावभर मटण खोतनबीबीच्या समोर ठेवून त्यानं विचारलं,

" तू अजूनपर्यंत सलवार नेसली नाहीस ? काय म्हणू तुला ! माझं कधीतरी ऐकशील का ?"

" चला, दूर व्हा. तुम्हाला लाज पण नाही वाटत !"

" लाज ! नवराबायकोत लाज ती कसली ?"

" हे मटण कशाला आणलंत ?"

" कशाला म्हणजे ? स्वयंपाकासाठी !"

खोतनबीबीला चटकन आपल्या एकमात्र दाताची आठवण झाली. नबिर-शालच्या तोंडात तर तो देखील नव्हता. मग मटण खायचं तरी कसं ! मग नबिर-शालनंच सुचवलं, " हे जरा खूप शिजू दे म्हणजे नरम होईल. खूप दिवसांनी आपण मटण खातोय. आणि हो, ती सलवार तुला नेसावीच लागेल. चल–उठ बघू." नबिरशाल लहान मुलासारखा उसळला. इकडे खोतनबीबी त्याचं म्हणणं ऐकायला तयार नव्हती. पण तो हट्टालाच पेटला होता. शेवटी असं ठरलं की नबिरशालनं थोड्या वेळासाठी खोलीबाहेर जावं आणि खोतनबीबीनं ती लाल सलवार नेसावी.

नबिरशाल हातातली मटणाची पिशवी घेऊन खाली उतरला. खोतनबीबीनं दार जोरात लावून आतून कडी घातली. तिनं देवळीतून गाठोडं काढलं. सलवारीत नाडा ओवला. आणि लाजत लाजत नेसली एकदाची. घाबरतच ती पायऱ्या उतरू लागली. परंतु आता पायऱ्या उतरताना तिच्या गुडघ्यांना दुखलं खुपलं नाही. ती हे पार विसरून गेली की तिच्या पायांना सांधेदुखी आहे. तिला फक्त एक गोष्टीची काळजी होती की नबिरशालकडं डोळा वर करून बघण्याचं धैर्य तिला होईल का ? आणि कुणी बघितलं तर...हाय रे देवा ! ती पार घाबरली होती.

नबिरशाल स्वयंपाकघरात चुलीजवळ बसून गुणगुणत होता. तर कधी मध्येच जाळ फुंकत होता. हळूहळू पावलांचा आवाज होऊ न देता खोतनबीबी तिथं पोचली. शक्यतो पावलांचा आवाज होऊ नये ह्याची जबाबदारी ती घेत होती. अन्यथा नबिरशालची नजर तिच्यावर पडली असती. पण झालं नेमकं उलट. तिचा पाय चटईच्या दोरात अडकला आणि ती धाडकन खाली पडली. नबिरशाल खडबडून उठून उभा राहिला. त्यानं बघितलं खोतनबीबी उन्मळून पडलेल्या देव-दारासारखी आडवी पसरलीय. भयानं त्याच्या तोंडून हलकासा चित्कार बाहेर पडला. पण लगेच खोतनबीबीनं हनुवटी वर उचलली आणि हसत नबिरशालकडं

बघितलं. नबिरशाल तिला तिच्या दंडाला धरून उठविण्याचा प्रयत्न करू लागला.

"कुठं लागलं बिगलं तर नाही ना ?" तो चिंतीत झाला. खोतनबीबीनं लाजतच नकारार्थी मान हल्वली.

"तर मग उठ ना !"

खोतनबीबीनं पुन्हा नकारार्थी मान हलली. नबिरशाल मागेच लागला की उठून उभी रहा म्हणून. पण खोतनबीबी ऐकेना. शेवटी नबिरशाल तिचं बखोट धरून उचलण्याचा प्रयत्न करू लागला. नवविवाहित जोडप्याप्रमाणं दोघात बराच वेळ ओढाताण झाली. खोतनबीबी पार विसरली की, आपले केस आता पिकले आहेत. आणि नबिरशालही विसरला की त्याचा जावई आता उतारवयाचा आहे. सर्व जगाला जणू ते पार विसरले होते. अनोखं दृश्य होतं ते– खोतनबीबी खाली बसलीय आणि नबिरशाल तिला उठविण्याचा प्रयत्न करतोय. तशी दारावर खटखट झाली. बाहेर कुणीतरी घसा खाकरत होतं. नबिरशाल चटकन खाली बसला जणू काही घडलंच नाही. आणि खोतनबीबी तर लाजून पार जमिनीत गाडल्या-सारखी उभी होती. येणारा दुसरा तिसरा कुणी नव्हता तर त्यांचाच मोठा जावई होता, जो बराच वेळपासून हे सर्व काही पहात आपलेच ओठ चावत उभा होता.

"सलाम आलेकुम" नबिरशाल म्हणाला, "आत या ना." पण जावईबापू काही बोललेच नाही. आल्या पावली परत फिरले. जणू काही भूतच बघितलं. खोतनबीबीचं तर शरमेनं पार पाणीपाणी झालं होतं. जणु चोरी करतानाच कुणी तिला पकडलं होतं. गुन्हेगाराप्रमाणें ती नबिरशालकडे पाहू लागली. तसा तो उठला आणि म्हणाला, "ह्यात घाबरण्यासारखं काय आहे. आम्ही काय चोरी थोडीच केलीय ! अग स्वत:च्या घरात प्रत्येकजण शहेनशहा असतो."

# असंही होऊ शकतं !

सरसूनं भरलेलं शेत डुलत होतं आणि वसंत ऋतूतील आल्हाददायक झुळकीनं विव्हल होऊन कोकिळा आपल्या सख्याला जवळ बोलावत होती. वन उपवन हिरवंगार दिसत होतं. आणि नरगिस[१] जणू काही मदिरेचा प्याला हाती घेऊन भ्रमरासाठी अधीर झाली होती. परंतु ह्या सर्वांवर वैतागून मल्लिक साहेब आपल्या स्कोडाकारमध्ये बसून गाव सोडून शहराकडे पलायन करीत होते. त्यांचं डोकं जाम दुखत होतं. आणि त्यामुळे त्यांच्या कानात आवाज सारखा घुमल्यासारखा वाटत होता. राहून राहून त्यांच्या डोक्यात फक्त एकच विचार येत होता, " किती गावढळ आणि बेपर्वा असतात खेड्यातले लोक. अवामी राज जिंदाबाद, मल्लिकसाहेब मुर्दाबाद ! हॅं ! जणू काही ह्यांच्या ओरडण्यामुळे लोकराज्य अमर होणारच आणि मल्लिकसाहेब मरणारयत. लोकराज्य म्हणजे गाढवाचं राज्य !" कारमध्ये बसलेले मल्लिकसाहेब अशाच कुठल्याशा विचारात होते. मध्येच ते चेहरा वेडावाकडा करीत तर मध्येच दातओठ खात. त्यांच्या विचारानुसार सत्ता, कायदा आणि पोलिस या तिघांची प्रेतयात्रा त्याच दिवशी निघाली होती ज्या दिवशी महाराजासाहेब काश्मिर सोडून निघून गेले होते. आणि ही गाढवं, मेंढ्या आणि हे आवारा मिरासदार सरकारी गाड्यांवर आणि जीपवर चावऱ्या कुत्र्यांसारखे तुटून पडले होते. या गाढवांच्या गोंधळात देखील त्यांना आशा होती की, त्यांच्यापैकी काहीजण सत्तेवर असल्यामुळेच गाडी थोडी तरी रुळावर आहे आणि कायदा व पोलिस व्यवस्था कशी का होईना पण व्यवस्थित चालतेय खरी. परंतु त्यांची काही माणसं सत्तेवर असतानादेखील ह्या गावकऱ्यांनी मल्लिकसाहेबांच्या जहागिरीचा सत्यानाश केला होता. मल्लिकसाहेबांना चारी दिशेला आता फक्त अंधारच दिसत होता. त्यांना काय म्हणावं तेच समजत नव्हतं. जरा कुणाला आपली कर्मकहाणी सांगावीशी वाटली तर लगेच त्याच्या तोंडून ' इन्कलाब जिंदाबाद 'चा नारा ऐकायला मिळे. ' इन्कलाब जिंदाबाद 'चा अर्थच मुळी मल्लिक साहेबांना उमगत नव्हता. त्यांना नुन्द ऋषीचा एकच श्लोक राहून राहून आठवत होता– ' तात तब होगा वानर राज...' आणि ते विचार करीत ' वानर राज ' तर हेच आहे, ज्यांना हे मूर्ख लोक लोकराज्य म्हणताहेत. हा श्लोक अगदी त्यांच्या मनासारखा जुळला होता. एका गोष्टीवर ते जाम खुश होते की वडीलधाऱ्या मंडळींनी ह्यालाच शेवटचं युग म्हटलंय आणि या कलियुगानंतर प्रलय हा अटळ आहे. किती बरं होईल जर प्रलय लौकरच आला तर ! सगळं काही नामशेष

---

१. नरगिस एक फिकट पिवळ्या रंगाचे फूल.

होईल. पर्वत एकमेकांवर आपटले आणि सूर्य पृथ्वीच्या फक्त सातआठ हातावरच आला तर ! सर्वनाश होईल सर्वनाश ! पण तो जरा लवकर आला तर बरं होईल.

त्यांना गावातल्या एका शेतकऱ्याचा चेहरा आठवला– त्याचं तेव्हाचं रूप, जेव्हा महाराजासाहेबांचं राज्य होतं आणि त्याचं आत्ताचं हे रूप. ते हैराण होते की दैवानं हा उलटा फासा कसा टाकला. तोच शेतकरी जो कोकरासारखे दयनीय डोळे करून त्यांच्याकडं टकमका बघायचा. पाटील, पटवारी आणि पोलिसाचं नाव ऐकताच ज्याला कापरं भरायचं, तोच आता वाघ बनलाय. दिवसरात्र सारखा ओरडत असतो की, आता त्याची सत्ता आहे. पोलिस, न्यायालय, पटवारी सगळ्यां-वर त्याचा अधिकार आहे. या गोष्टीचं राहून राहून त्यांना हसूही येत होतं आणि रडूही.

पात्छोकला पोचल्यावर अचानक कारचे ब्रेक लागले तसा मल्लिक साहेबांचा तोल पुढे गेला.

"काय झालं ?" वसकन ओरडून त्यांनी ड्रायव्हरला विचारलं.

"साहेब, हा साला एखाद्या जनावरासारखा मधोमध चालतोय. किती वेळा हॉनं वाजवला पण ह्याच्या कानात जणू कापसाचे बोळे कोंबलेयत."

"ओ हो ! लेकाच्याला मरायचंच असेल तर गळ्याला कशाला फास लाव-तोय ?" मल्लिकसाहेब कडवटपणे उद्गारले.

"मनात येतं साल्यांची टांगच तोडून टाकावी."

"खरंच की काय ?" मल्लिकसाहेब ड्रायव्हरला खिजवत म्हणाले,

"आमची हाडं खिळखिळी करण्याचा विचार आहे का बाबा ? अरे आजकाल तर ह्याच लोकांचं राज्य आहे."

"आलेत मोठे राज्य करणारे ?" पुन्हा कार स्टार्ट करीत ड्रायव्हर उद्गारला.

मनातल्या मनात मल्लिक साहेब म्हणाले, "देव करो आणि ह्यांच्या ह्या इच्छा पुऱ्या न होवोत आणि महाराजसाहेब पुन्हा येवोत मग मजा दाखवेन या बद-माशांना." मल्लिकसाहेब आपल्याच विचारात कुठे हरवले कुणास ठाऊक जमीन हातची गेल्यापासून त्यांना स्वतःच स्वतःशी बोलत रहायची सवय जडल्यासारखी झाली होती. कधी कधी तर ते इतक्या जोरात ओरडायचे की, वाटावे जणू काही ते कुणाशी मोठ्यानं भांडताहेत. यावेळी ते विचार करीत होते की महाराजासाहेब जर पुन्हा सत्तेवर आले तर या लोकराज्यातील माकडांची नशा पार उतरवून टाकतील. मग बघा या गफ्फारा नदरूचं डोकं मी कसं ताळ्यावर आणतोय ते. मोठा हलका प्रेसिडेंट[२] बनून फिरतोय–गावमामा ! कालपर्यंत तर अन्नाच्या एक

---

२. काश्मीरचे शेवटचे डोगरा शासक महाराजा हरिसिंह जे पाकिस्तानी आक्रमणा-नंतर काश्मीर सोडून गेले.

एक कणाला महाग होता. आणि आज निघालाय प्रेसिडेंट व्हायला ! साल्याची अशी धुलाई करेन वेताच्या छडीनं ! " रागाने ते बडबडू लागले.

" कुणाची साहेब ? "

" अं ? कुणाचीच नाही बाबा ! " मल्लिक शर्मिदा झाले आणि त्यांनी उत्तर द्यायचं टाळलं. ड्रायव्हरदेखील यांना नाहीतरी बडबड करण्याची खोडच लागलीय या विचारानं गप्प बसला.

संध्याकाळी सूर्यास्तानानंतर मल्लिक साहेब शहरात पोहचले. शहरी लोकांची त्यांना आधीपासूनच घृणा वाटत असायची आणि लोकराज्यानंतर ही घृणा अधिकच वाढली होती. त्यांच्या मतानुसार या सगळ्या बर्बादीला हेच कारणीभूत होते. नाहीतर या खेड्यापाड्यातील गावढळांना काय माती कळतंय. ह्या बारीक सारीक बाबी ह्यांच्या टाळक्यात कुठून येणार ? शहरातील विलक्षण सामसूम पाहून मात्र ते फार खुश झाले. सोनवारीच्या थोडं समोर तर फक्त गिधाडंच ओरडत होती. दुकानातून आणि घरातून अंधार होता. लॅम्प पोस्टावरील बल्ब खाना बेडीच्या खाचा झालेल्या डोळ्यासारखे दिसत होते. स्कोडा कारच्या दिव्याच्या प्रकाशात त्यांना लोक पायात शेपूट घालून फिरणाऱ्या कोल्ह्यांसारखे इकडे तिकडे धावपळ करताहेत असं वाटलं. आकस्मिकपणे छद्मी हसत ते उद्गारले, " हूँ ! हूँ ! ! लोकराज्य ! "

ड्रायव्हर काहीच बोलला नाही. यावेळी तर त्यानं वळूनही बघितलं नाही. तो फक्त गालातल्या गालात हसला.

शहरात पोहचता पोहचता मल्लिक साहेब बरेच वैतागलेले दिसत होते. गावाकडून पळून ते इकडे आले होते खरे, परंतु इथे येऊन शहरवासियांबद्दल त्यांची घृणा आणखीनच वाढली. आगीतून निघून फुफाट्यात पडल्यासारखे त्यांना जाणवले. पण बिचारे करणार काय ? गाव किंवा शहर, शेवटी कुठंतरी रहावंच लागणार. त्यांना आवडो वा नावडो, इथून पळून जायचं म्हटलं तरी ते जाणार तरी कुठं ?

लाल चौकात पोहचल्यावर त्यांनी ड्रायव्हरला गाडी एका हॉटेलसमोर घ्यायला सांगितली. कारमधून उतरत त्यांनी चौफेर दृष्टी फिरवली. लोक इकडून तिकडे ये-जा करीत होते. सायकली इकडे तिकडे धावत होत्या, चौकीवरचा पोलिस कधी डावीकडे तर कधी उजवीकडे हाताचे इशारे करीत होता. मल्लिक साहेब बघत होते की कुणी ओळखीचा तर निघणार नाही ना ? सडकेवरून जाणारा प्रत्येकजण त्यांना अनोळखी आणि परका वाटू लागला. नुसता अनोळखीच नाही तर शत्रूदेखील वाटू लागला. ह्याच शहरातल्या काळ्याबिद्र्या, मरतुकड्या भुशाच्या पुतळ्यांनी त्यांच्या मतानुसार हा सर्वनाश घडवून आणला होता. त्यांच्या तोंडून अचानक शब्द बाहेर पडले,

" मशीनगन्सनी उडवून टाकीन साल्यांना !"

" कुणाला साहेब ?" ड्रायव्हरने विचारले. त्याने कार बाजूला उभी केली आणि तो त्यांच्यासमोर उभा राहिला.

" अं ? नाही, कुणालाच नाही..." मल्लिक साहेब लज्जित झाले आणि त्यांनी विषयांतर केलं. ड्रायव्हरनंही तसंच केलं.

" आज इथंच, या हॉटेलात मुक्काम करावा म्हणतोय," मल्लिक साहेब ड्रायव्हरला म्हणाले. मनात विचार केला, आज चिकार दारू प्यायची आणि दु:ख हलकं करायचं. पण एवढ्यात त्यांना चिनारबाबांनी केलेला उपदेश आठवला. ते विचार करू लागले. बाबांनी सांगितलेलं खरं निघेल की नाही कुणास ठाऊक. सर्वच वायफळ तर जाणार नाही ना ? मग लगेच विचार आला कदाचित खरंही होऊ शकेल. माणूस नावाच्या प्राण्याच्या त्वचेखाली अनेक गुप्त गोष्टी दडलेल्या असतात. मग बिघडलं कुठं ? चाळीस दिवसच तर दारू वगैरेपासून दूर राह्यचं. त्यातले दहा दिवस तर गेलेच. अजून एक महिना शिल्लक आहे, बघू तर खरं काय होतंय या एका महिन्यात. ' आज बासेवाल्याकडं मुक्काम करायचा नाही साहेब ?" ड्रायव्हरनं विचारलं.

" नाही, नाही. आज मी इथंच थांबणार." मल्लिक साहेबांना आता बासेवाल्याचाही राग येत होता. लोकराज्याच्या आंदोलनास त्यांनीही उदार अंत:करणानं पैसा दिला होता. मल्लिक साहेबांना आता हे लोकदेखील शत्रू वाटत होते.

ड्रायव्हर सलाम करून निघून गेला. मल्लिक साहेब आता एकदमच एकटे पडले. ड्रायव्हरच्या संगतीत किमान कुणाची तरी सोबत आहे हा दिलासा तरी होता. एक आणि एक अकरा होतात ! ड्रायव्हर गेल्यामुळे ते अगदीच एकटे–एकाकी पडले आणि त्यांच्या आजुबाजूला तर सारेच त्यांचे शत्रू. त्यांनी चहूकडे आपली दृष्टी वळवली. त्यांना कुणीच आपलं दिसेना. एक लांब सुस्कारा टाकला त्यांनी. एवढ्यात दुरून कुणीतरी येतोयसा भास त्यांना झाला. ' अरे सैय्यद साहेब तर नाहीत ना ? अरे हो, तेच तर आहेत. ' त्यांनी जोरानं हाक मारली– " सैय्यद साहेब– "

ते सैय्यद साहेबच होते. मल्लिक साहेबांचे जुने दोस्त. जे महाराजांच्या कारकिर्दीत तहसीलदार होते. आणि बरीच वर्षे मल्लिकसाहेबांच्या विभागात होते. दोघे मित्र कडकडून भेटले. बराच वेळ एकमेकांचं कुशल विचारत बसले. शेवटी मल्लिकसाहेबांनी विचारलं " हं, मग हल्ली काय करत असता ? " त्यांना वाटलं की, महाराजांशी प्रामाणिक राहिल्यामुळे कदाचित त्यांना नोकरीवरून काढलं असावं. परंतु सैय्यदसाहेबांनी उत्तर दिलं, " सध्यातरी तहसीलदारच आहे, बढतीची आशा आहे. "

" बढती ! " मल्लिकसाहेबांना आश्चर्याचा धक्काच बसला, " ती कशी काय

बुवा ? आणि तीही या माकडांच्या राज्यात ? ''

" हा–हा–हा ! " सैय्यदसाहेब खळाळून हसले आणि म्हणाले, " स्वतःच्या कर्तृत्वावर आणखी कशाच्या जोरावर ? ''

'' कर्तृत्व ? '' मल्लिकसाहेबांच्या डोक्यात यातलं एकही अक्षर शिरत नव्हतं.

'' या अंधेरनगरीत कर्तृत्वाला विचारतो कोण ? ''

'' खरोखरच मूर्ख आहात. '' सैय्यदसाहेब उतरले.

इतक्यावर देखील मल्लिकसाहेबांच्या डोक्यात काही शिरेना. तेव्हा ते विचार करू लागले की शक्यता आहे आपण मूर्ख असू झालं ! मग त्यांनी विचारलं

"अरे हां ! ते शाकिर, बाकिर आणि जाकिरसाहेब हल्ली कुठं असतात ? ''

'' कुठं असणार ? नोकरी करीत असतील. मामला काय आहे ? ''

'' छे ! छे ! तसं काही नाही. मी असा विचार करतोय की, ही ग्रामीण भागातील मंडळी म्हणताहेत की सत्ता आता त्यांची आहे हे कसं काय ? ''

'' हा–हा–हा '' सैय्यदसाहेब पहिल्यापेक्षाही जोरात खिदळू लागले. पंधरा मिनिटं तरी त्यांना आपला तोल सांभाळता आला नाही. मल्लिकसाहेब बिचारे हैराण होऊन गेले की, ह्यांना कुठला अॅटॅक तर आला नाही ना ! अखेर ते म्हणाले, '' अहो, काही सांगाल की नाही ?''

'' तुम्हाला काय सांगणार कपाळ !'' सैय्यदसाहेब हसत हसत म्हणाले, '' तुम्ही कुठून एखाद्या विजनवासातून, रानावनातून तर येत नाहीत ना ? साधी गोष्ट आहे, चार दोन मंत्री बदलले म्हणजे अख्खी शासनव्यवस्था थोडीच बदलते ? ''

आता कुठे मल्लिकसाहेबांच्या डोक्यात प्रकाश पडू लागला आतापर्यंत त्यांचे हेच मत होते की लोकराज्यात वरपासून खालपर्यंत सर्वच ऑफिसर नवे असतील. जुन्यापैकी कुणीच शिल्लक नसतील. परंतु आज जेव्हा त्यांना हे कळून चुकलं की सर्व काही जिथल्या तिथंच आहे, केवळ चार दोन मंत्रीच फक्त बदललेले आहेत तेव्हा कुठं चिनारबाबांनी सांगितलेल्या गोष्टीवर आता त्यांचा विश्वास बसू लागला. त्यांना खात्री पटली की अंतीम विजय आपलाच आहे. महाराजासाहेब परत येणार आणि या दोनचार मंत्र्यांना काढून फेकणार. मग काय–राज्य आपलंच पूर्वीसारखं. ह्या विचारांनी मल्लिक साहेबांना मनावरचं ओझं हलकं झाल्यासारखं वाटलं. त्यांनी विचार केला–खरंच नशापाणी करता कामा नये, हे पथ्य पाळायलाच हवं.

मल्लिकसाहेबानी सैय्यद साहेबांची मग चांगलीच सरबराई केली. त्यांना यथेच्छ मटण बिर्याणी खाऊ घातली आणि काही वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर म्हणाले, '' असं ऐकतोय की खेडोपाडी कालवे खोदणार आहेत म्हणे.'' सैय्यदसाहेब उत्तरले, '' जोपर्यंत आम्ही आहोत तोपर्यंत हे सर्व खोटं समजायला हरकत नाही. ''

मल्लिकसाहेबांना आता दिलासा वाटू लागला. उत्साहानं त्यांनी पुन्हा विचारलं,

"आमच्या जमिनीही परत मिळतील म्हणायच्या ! "

"हे देखील खोटं समजायला हरकत नाही." बेफिकीरपणे सैय्यदसाहेब उत्तरले. तसं मल्लिक साहेबांच्या मनात चर्र झालं. काळजावरून कोणी सुरी फिरवतोयसं झालं. मग मन घट्ट करून त्यांनी इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. परंतु खरं सांगायचं म्हणजे सैय्यद साहेबांच्या उत्तरानं त्यांचे डोळे टचकन् पाणावले. त्यांना मनापासून वाटायला लागलं की ही पीडा आता टळेल तर बरं. सर्वांच्या नजरा टाळून चूपचाप एकटं बसायला मिळेल तर बरं.

बऱ्याच वेळाने सैय्यद साहेब गेले. तसे मल्लिक साहेब आराम करण्यासाठी स्वतःच्या रूममध्ये गेले. परंतु त्यांना झोप येईना. खोलीच्या भिंती त्यांना जणू काही खायला उठत होत्या. त्यांचं डोकं गरगरत होते. राहून राहून डोळ्यासमोर गफ्फारा नदरूचा चेहरा तरळू लागला. त्याची भाषणं त्यांना आठवू लागली... "आता सरकार आमचं आहे, राजसत्ता आता चालणार नाही, आता लोकांचं राज्य आहे...खानदानी मोठेपणा आणि दबदबा आता चालणार नाही, दादागिरी, धमक्या ह्यादेखील...आज आम्हीच आमच्या नशिबाचे धनी आहोत." त्या जोडीनंच सैय्यद साहेबांचे 'ते' शब्द आठवले, 'हे देखील खोटं समजायला हरकत नाही.' यामुळे त्यांच्या जीवाची घालमेल अधिकच वाढली. मग त्यांनी खेड्यातील माणसं, हलका प्रेसिडेंट, सैय्यद साहेब, शाकिर साहेब, बाकिर साहेब आणि जाकिर साहेब या साऱ्यांवर शिव्यांचा वर्षाव केला. 'साले ऑफिसर आहेत की चोर लेकाचे ! जोपर्यंत महाराजसाहेबांची सत्ता होती तोवर आमचे तळवे चाटत होते. आणि आता म्हणताहेत, 'हेही खोटं समजा !'

मल्लिक साहेबांना जशी आता काही होणार नाही याची खात्री वाटू लागली तसं त्यांच्या मनात आलं, चला, खूप दारू मागवावी आणि भरपूर चढवावी. तो चिनारबावा गेला उडत. आता तो काय करू शकणार आहे ? जे व्हायचं ते होऊन गेलं. आता तो नंगा फकिर कसला चमत्कार दाखवणार आहे. सत्ता तर आमची राहिली नाही. आणि पुढची गोष्ट तर बोलणंच सोडा. वेळही बराच झाला होता. आणि खूप बडबड केल्यामुळे मल्लिकसाहेबांचं डोकं भयंकर ठणकत होतं. कैकदा त्यांना शंका आली सन्निपात तर झाला नसेल ना ! ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळून वळून शरीरही पार खिळखिळं झाल्यासारखं वाटत होतं. इतक्यात शेजारच्या खोलीत लष्करी बुटांचा आवाज ऐकू आला. मल्लिकसाहेबांची खोली आणि यामध्ये फक्त एक लाकडी पार्टिशन काय ते होते. त्यांना एका स्त्रीच्या हुंदक्याचा आवाज ऐकू आला. कुणी पुरुष करड्या आवाजात म्हणत होता- 'आता तुम्ही

जाऊ शकता."

मल्लिकसाहेब हळूच उठले. आणि लाकडाच्या पार्टिशनला कान लावून उभे राहिले. स्त्री रडतच होती. पुरुष बाजूला शांत बसला असावा—मल्लिकसाहेबांनी फटीतून आत डोकावून पाहिले. स्त्री खाली मान घालून बसली होती. आणि गण-वेषातला एक पोलिस अधिकारी जवळच बसून दारूचे घुटके घेत होता. त्यांनी त्या पोलिस अधिकाऱ्याचा चेहरा पाहण्याचा खूप प्रयत्न केला परंतु तो त्यांच्याकडे पाठ करून बसला होता. अर्धा तास असाच गेला. अन् तेवढयात खोलीतून त्या स्त्रीची किंकाळी कानी पडली. ह्या किंकाळीत दुःख, क्रोध, भय सर्वच होतं. त्यात विवशता होती, विरोध होता, थरकाप होता. मल्लिकसाहेब बराच वेळ स्तब्ध बसले. त्यांना वाटलं एखाद्या निष्पाप बालकाचा आपल्या समोर कुणी तरी गळा चिरतोय. ते उठून हळुहळू खाली आले हॉटेलच्या चौकीदारास जागे करून त्यांनी विचारलं, "वर कोण बाई किंचाळतेय ती ? " चौकीदार हसला आणि अंथरुणात पसरल्या पसरल्याच म्हणाला, "ख्वाजासाहेब, वर जाऊन आराम करा. असल्या बाबतीत निष्कारण चौकशी करण्याचा प्रयत्न करू नका."

मल्लिकसाहेबांना काहीच उत्तर सुचेना. ते पुन्हा हळुहळू वर आले. त्यांच्या मनात अनेक विचारांचे वादळ निर्माण झाले. एकाएकी त्यांना बारा वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवला. एका शेतकऱ्याविरुद्ध त्यांची एक केस कोर्टात चालू होती. सुनावणी शहरातच होती. ते शहरात पोचले तेव्हा त्यांना समजलं की त्या शेत-कऱ्यानं आपल्या मुलीलाही आपल्या बरोबर आणलं आहे. ते ठाणेदाराकडे गेले. आणि त्याला सर्व काही सांगितलं. दोघांनी मिळून एक कट रचला. त्यानुसार ठाणेदारानं त्या शेतकऱ्यास निरोप पाठवला की, सत्य परिस्थिती काय आहे ती जरा एकांतात स्पष्ट करून सांग म्हणजे कोर्टात मी तुझ्या बाजूनं साक्ष देऊ शकेन आणि हां तुझी ती पोरगीही डोळ्यांखालून घालीन म्हणतो, म्हणजे ती नवऱ्याला साजेशी आहे की नाही हेही समजेल. पत्ता काढीत काढीत जसा शेतकरी हॉटेलात येऊन पोचला तसं शेतकऱ्यानं ठाणेदाराच्या पायावर आपलं मुंडासं ठेवलं आणि तो गयावया करू लागला की माझ्या गरीब पोरीवर दया करा आणि मला या कोर्टकचेरीच्या जंजाळातून सोडवा. पीर दस्तगीर साहेब अनेक संकटांतून तुम्हाला वाचवतील. शेवटी ठाणेदार म्हणाला, "ठीकंय्. खाली बाजारात जा आणि सिगा-रेटचं एक पाकीट घेऊन ये." शेतकरी खाली जाताच लपलेले मल्लिकसाहेब खोलीत आले. दोघांनी मग आतून कडी लावली. आणि बिचाऱ्या पोरीवर झडप घातली—

पण तेव्हाचा जमानाच और होता. काय बिशाद की तो शेतकरी हूं का चूं करील.. चूपचाप विषाचे घोट गिळत राहिला. पण आज असं घडू शकतं का ? आज तर ह्या हलक्या प्रेसिडेंटची औलाद एकच धूमाकूळ घालील. "सत्यानाश हो या सैतानांचा !" मल्लिकसाहेबांच्या तोंडून हे शब्द जरा जोरातच बाहेर पडले.

तसा शेजारच्या रूममधून आवाज आला, "कोण आहे रे तिकडं."

मल्लिकसाहेबांची वाचा गेली. पटकन त्यांनी जीभ चावली. तोंडातून शब्दच फुटेना. ते आपादमस्तक भीतीने थरथर कापू लागले. विचार करू लागले, हा कोण हलका प्रेसिडेंट तिथं बसलाय...हां हा नक्कीच हलका प्रेसिडेंट असला पाहिजे. आजकाल अशी कसाबकरणी यांच्याशिवाय कोण करणार? आमचं तर सगळं संपलं आता. आता राज्य यांचंच यांनाही जमीन जहागीर भेट दिलीय, पण जरा वेगळ्या प्रकारची.

सकाळी मल्लिकसाहेब अद्याप झोपलेले असतांनाच दारावर टकटक झाली. मल्लिकसाहेबांचं धाबं दणाणलं. हातपाय जणू थंड पडले. उठायचीदेखील ताकद उरली नाही. अंगात बाहेरून गोंधळ ऐकायला येत होता–

"तोडा दरवाजा आणि बाहेर काढा या खविसाला! तुम्ही लोकांनी याला रात्रभर इथं ठेवलंच कसं?"

मल्लिकसाहेबांना उमजून चुकलं की आपल्या बडबडीमुळेच आपल्यावर हा प्रसंग ओढवलाय. रात्री जर आपण ओरडलो नसतो तर ह्या हलक्या प्रेसिडेंटच्या रंगात भंग झाला नसता. त्यांचा चेहरा निस्तेज पडला आणि दबकत दबकत त्यांनी कडी काढली.

दरवाजा जोरात उघडला आणि मल्लिक साहेब जवळ जवळ ओरडलेच– "–अरे तुम्ही होतात तर!" हा तोच ठाणेदार होता. ज्याच्याबरोबरीनं मल्लिकसाहेबानं त्या खेडवळ मुलीवर याच हॉटेलात बलात्कार केला होता. परंतु तो आता ठाणेदार नसून पोलिस खात्यातला एक बडा अधिकारी झाला होता. त्याने बाकीच्या लोकांना जायला सांगितले आणि मल्लिकसाहेबास मिठी मारून म्हणाला–

"अरे तुम्ही सांगायचं नाही का की, मी मल्लिकसाहेब आहे म्हणून?"

"मला काय ठाऊक की आताही हे असं होत असेल म्हणून!"

मल्लिकसाहेब त्रस्त होत म्हणाले, जणू काही ते स्वतःलाच या गोष्टीची खात्री पटवून देत होते.

---

३. हल्का प्रेसिडेंट– नॅशनल कॉन्फरसच्या (महाराजा हरिसिंह ह्यांच्या नंतरचे सत्ताधारी दल) क्षेत्रीय समितीचे अध्यक्ष.

# बैल आणि बैल

सकाळी उजाडल्या उजाडल्या आईनं मला हलवून जागं केलं आणि म्हटलं, "बेटा उठ बघू...म्हमदू तेली बिचारा गेला."

मला वाईट वाटलं. सकाळची साखरझोप सगळ्यांनाच आवडते. आणि मला तर जास्तच आणि असा कोणता मोठा माणूस मेलाय की फातिहा[1] वाचायला जाणं अगदी आवश्यक आहे? अंथरुणात पडल्या पडल्या मी टंगळ मंगळ केली. परंतु आईनं ऐकलं नाही, नाईलाजानं उठावंच लागलं शेवटी.

म्हमदू तेली आमचा शेजारी होता. आमचं घर त्याच्या घराला लागूनच होतं. आपल्या घाण्यावर जेव्हा 'हाट्, तुझी चामडी लोळवीन हां" म्हणत बैलाला चाबकानं तो फटकारायचा तेव्हा आमच्या घरात ते स्पष्ट ऐकू येत असे. परंतु म्हमदू तेल्याचं कुणाकडंच येणं-जाणं नव्हतं. फक्त आसपासचे शेजारी त्याला ओळखत, नाहीतर थोडेबहुत गिऱ्हाइक. पण त्यांच्या बरोबर देखील त्याची उठबस नव्हती की दुवा-सलाम[2] नव्हता. जेव्हा जेव्हा एखादं गिऱ्हाइक त्याच्याकडं तेल घ्यायला जाई तेव्हा तेव्हा म्हमदू तेली बैलाशी बोलताना दिसे– "घे, खा गबत ! खा ना ! ये तुला जरा खाजवतो."

बैलाशिवाय म्हमदू तेली कोणाशीच बोलत चालत नसे. फारच झालं तर एखाद्या समोर तो एवढंच म्हणायचा, "याच बैलात माझे प्राण आहेत प्राण ! जोपर्यंत हे चारा खाणार नाहीत तोपर्यंत मला चैन पडणार नाही."

आज म्हमदू तेली मेला... कुठलंच पोर बेवारशी झालं नाही. कुठलीच स्त्री विधवा झाली नाही. कुठल्याच मातेला पुत्रवियोगाचं दुःख झालं नाही. ना कुण्या सग्या सोयऱ्यांना सुतक पाळावं लागलं. गुपचूप कसलाही गडबडगोंधळ न करता म्हमदू तेली मेला. मोहल्ल्यातले काही शेजारीपाजारी एकच जमले. मयताला आंघोळ घातली आणि त्याला कब्रस्तानात पोचविलं फातिहा आणि नमाज पढून झाल्यावर मी घरी परतलो, जेवण केलं आणि कामावर निघालो.

सायंकाळी मी घरी परतत असतांना बाहेरच्या गल्लीतल्या म्हमदूच्या झोपडीवर माझी नजर गेली. बघतो तर काय तिथं दिवा जवळ होता आणि काहीजण आपापसात कुजबूजत बसले होते. घरी गेल्यावर आईनं सांगितलं की म्हमदूच्या घरी आज पंचायत बसली आहे. म्हणून.

"कसली पंचायत ?" मी विचारलं.

---

१. फातिहा : मृत व्यक्तीला सद्‌गती लाभावी म्हणून केली जाणारी प्रार्थना.

२. दुआसलाम : साधा रामराम. कसं काय या अर्थानं.

" म्हमदू तेल्याचे नातेवाईक त्याच्या इस्टेटीतून आपापला हिस्सा मागायला आले आहेत."

" नातेवाईक ! " मी बुचकळयात पडलो. आजपर्यंत तरी कधी मी म्हमदू तेल्याचे कुणी नातेवाईक असल्याचं ऐकलं नव्हतं. दुनियेत त्याचे कुणी नातेवाईक असू शकतील यावर माझा विश्वासच बसू शकत नव्हता. निदान मला कळतंय तेव्हा-पासून म्हमदू तेल्याकडं कधीच कुणा पाहुण्या–रावळयांना येता जाताना मी बधि-तलं नव्हतं. वा कुणाच्या तोंडून कधी ऐकलं नव्हतं की म्हमदू तेली कुण्या सग्या सोयऱ्याकडे गेलाय म्हणून ! माझ्या मतानुसार तर त्याचा बस एकच नातेवाईक होता; 'बदरी' बैल.

म्हमदू तेल्याकडं कोण नातेवाईक आले आहेत हे बघण्यासाठी मी त्याच्याकडे पोचली. म्हमदू तेल्याच्या घराला दोन खोल्या होत्या. पैकी एकात बैलाचा गोठा होता. आणि दुसरी वर होती. गोठयात त्याचा घाणा आणि बैल होता. आणि वरच्या खोलींत म्हमदू तेली उठत–बसत असे. स्वयंपाक करीत असे. झोपत असे आणि गिऱ्हाईकांना तेल विकत असे. ह्या दुसऱ्या खोलीत जायसाठी गोठयाच्या आतून एक शिडी होती. मी गोठयात प्रवेश केला. बदरीबैल अंधारात बसून रवंथ करीत होता. जणू काही उसासे टाकतोय. मला वाटलं बदरीला हे नक्कीच कळत असणार की म्हमदू तेली मेला म्हणून, तेव्हाच तर तो असे उसासे टाकतोय. कदा-चित त्याच्या डोळयातून अश्रूही ओघळत असावेत. अंधारामुळं काही दिसत नव्हतं. डोक्यात विचार आला, आज बदरी अनाथ झालाय. आज तोही सुतक पाळतोय, शोकविव्हल आहे. आता त्याच्याशी कुणी बोलणार नाही. त्याला असं आता कुणी म्हणणार नाही की, "बदरी हे घे, गवत खा ! खा ना ! ये तुला जरा खाजवतो !"

बदरीनं आणखी एक उसासा टाकला अन् मग डोकं असं काही जोरात हलवलं की त्यामुळे त्याच्या दोन्ही कानांचा आवाज झाला. वाटलं जणू काही तो दुःख वियोगानं, डोकं आपटून घेतोय. मला त्याची दया आली. मनात आलं की त्याला विचारावं, " बदरी, तू चारापाणी काही घेतलास का ? " पण का कुणास ठाऊक माझी मलाच शरम वाटली आणि मी गप्प बसलो कदाचित मला अशी भीती वाटली असावी की आपण बोललेलं कुणीतरी ऐकेल आणि लोक चिडवू लागतील म्हणतील, 'म्हमदू तेली ! म्हमदू तेली !' आणि या नावाची तर भयंकर चीड आहे मला. खुद्द म्हमदू तेल्याची देखील–लंगडुद्दीन दुनियेशी कुठलंच देणं घेणं नसलेला. तोंड चक्क माकडासारखं. ना कुणी त्याला आपली मुलगी दिली न त्याला कधी लग्नाची इच्छा झाली. साऱ्या जगापासून आगळा वेगळा. बैलाचाच एक जोडीदार भाऊ, एक दुसरा बैल.

जेव्हा घाण्यावर बसून बैलाला तो चाबकाने फटकारायचा– 'हाट तुझ्या.

Indian ... 117043

तुझी चामडी लोळवीन हां ! ' असं म्हणायचा त्यावेळी तर तो आणखीनच घाणे-रडा दिसायचा. बैल डोळयावर पट्टी बांधून वेगानं गरगर फिरायचा पुढे, आणखी पुढे– पोचायला अंतिम ठिकाण कुठं होतं ? मी मी विचार करायचो, हे कसलं जीवन ? डोळयांवर पट्टी बाधून छडीच्या इशाऱ्यावर चालतच रहा ! जेव्हा घाण्यावर बसून बदरीच्या मागे मागे चालत जायचा, आसपास चकरा मारायचा निरुद्देश, निष्कारण–तेव्हा मला म्हमदू तेल्याचं जीवन शुद्ध भिकारचोटपणाचं वाटायचं परंतु बदरीची मला राहून राहून कणव येत होती. दोनतीनदा तर शब्द अगदी ओठावर आले होते की, ' बदरी तू चारापाणी काही घेतलंस का ?' पण प्रत्यक्षात मात्र म्हणालो काहीच नाही.

वरच्या खोलीत मोहल्यातील दोघेचौघेजण मला बसले ले दिसले आणि त्यातले दोघेजण असे होते की ज्याना मी कधीच बघितलं नव्हतं. मनात शंका आली कदाचित हेच म्हमदूचे नातेवाईक असतील.

त्यातल्या एकानं मला संबोधून म्हटलं, " या हजरत बसा इकडं." दुसरा म्हणाला, " हा तर मंडळी, आता जरूर योग्य निवाडा होईल, कारण आता चार बुकं शिकलेले एक हजरत आपल्यात आहेत. "

आतल्या आत माझा ऊर अभिमानाने भरून आला. परंतु चेहऱ्यावर तसे दिसू दिले नाही. शेवटी एकाला विचारलं, " मामला काय आहे ? "

" जी, हे म्हमदू तेल्याचे नातेवाईक आहेत आणि हे जे डोक्याला रुमाल गुंडाळून बसले आहेत ना त्याच्या चुलतभावाचे मेव्हणे आहेत. आणि हे हजरत त्याच्या बापाच्या मामेभावाचे जावाई आहेत. आणि हे... ! "

सांगणारा गप्प झाला. वास्तविक पाहता त्यालाही हे माहीत नव्हतं की ती तिसरी व्यक्ती म्हमदूची नक्की कोण लागते ती ! हजरत शेवटी स्वतःची ओळख करून द्यायला लागले, " मी त्याचा अगदी जवळचा नातेवाईक आहे. आम्हा दोघांचे वाडवडील एकच आहेत. त्याचं काय आहे म्हमदू तेल्याच्या आजोबाचे एक बंधू होते. बिचारे निपुत्रिक वारले. त्यांनी बर्जुलाच्या कुणा रहमान डारला दत्तक घेतले होते. त्याच महाशयांचा मी मुलगा होय.

तिघांच्या परिचयानंतर मी मनातल्या मनात विचार करू लागलो की हे तर सर्व नाममात्र नातेवाईक आहेत. शेवटी त्यांना विचारलं,

" आजपर्यंत मी तुम्हा लोकांना इथं कसं बघितलं नाही ? " ज्या दोघांकडं माझी नजर होती ते चुपचाप बसले होते, पण ज्या तिसऱ्यावर नजर नव्हती, त्याने खुलासा करायला सुरुवात केली,

" अरे साहेब काय सांगणार, स्वतःच्याच जंजाळातून वेळ मिळतोच कुठे ? नाहीतर आम्ही इकडे आलो गेलो नसतो ? माझ्या बायकोला म्हमदू तेल्याची इतकी काळजी होती...इतकी काळजी होती की ती रोज मला म्हणायची की,

त्याची खबरबात का घेऊन येत नाही ? परंतु साहेब, वेळ मिळेल तेव्हा ना ?"

" तर मग हजरत, आज कसा काय वेळ मिळाला ?"

" माशाल्लाह ! साधारणत: तीन वाजता मला कळलं की त्याचं देहावसान झालं. म्हणून बातमी ऐकताच, काय सांगू माझ्यावर आभाळच कोसळलं ! घरच्यांना देखील कळवलं नाही-मी विचार केला, बातमी ऐकून त्यांना धक्काच बसेल. आणि स्वत: मीच धावत येथे पोहचलो. आमच्यावर भारी प्रेम होतं हो त्याचं..."

" त्याचा-तुमचा स्नेह जरूर असेल परंतु जनाब तुम्हाला त्याच्याबद्दल जिव्हाळा वाटत होता का ? " यावर ते एकदम गप्प बसले. तिकडे पंच काहीसे बेचैन दिसत होते. कदाचित ते असा विचार करीत असावेत की, हा कोण दीड शहाणा मध्येच टपकला ! आम्ही केव्हाच मामला मिटवला असता आणि आपापल्या घरी गेलो असतो. यावर एक महाशय म्हणाले, " हजरत, आता तुम्ही आम्हाला हे सांगा की शरीअती[3]नुसार कुणाच्या वाट्याला इस्टेटीचा किती वाटा येणार आहे ते. "

शरीअतच्या बाबतीत तर मी ठार अनपढ होतो. गोष्ट अशी आहे की असल्या बाबी मोठ्या नाजूक असतात. पीर-मुफ्ती लोकांना तर हा डाव्या हाताचा खेळ वाटतो, परंतु माझ्यासाठी...

" हे बघा मंडळी, शरीअतीनुसार कुणास काय मिळेल ते मला माहीत नाही. हां, कायदा अवश्य जाणतो मी. "

" तर मग कायदा सांगा. "

" कायद्यानुसार तर ह्यापैकी कुणालाच काही मिळणार नाही. कारण आजपर्यंत म्हमदू तेल्याबरोबर ह्यांचं कुठलं कसलंच नातं नव्हतं. आजपर्यंत तरी मी यांच्यापैकी कोणा एकालाही कधीच इथं आलं गेलेलं बघितलं नाही. आज केवळ त्याची इस्टेट गडप करण्यासाठी हे त्याच्याशी नातं जोडू पाहताहेत. "

माझ्या या बोलण्यावर सगळेच हसले. म्हमदू तेल्याच्या नातेवाईकांना वाटलं मी जणू त्यांची मस्करीच करतोय. आणि पंचांना वाटलं की, मी स्वत:च त्याचं झोपडं लुटण्यासाठी हा डाव टाकतोय. नातेवाईकांचं ते हसणं जणू मला सांगत होतं, ' अरे साहेब, करा एकदाचा न्याय निवाडा आणि जाऊ द्या घरी राजी–खुशीत आणि पंचांच्या हसण्याचा अर्थ असा होता की, बच्चमजी तू जर इंचभरही जागा हडपण्याचं ठरवलंस तर तीही तुला लाटू देणार नाही.

शेवटी हजार गोष्टी सुनावून मी एकदाचा निवाडा केला. परंतु म्हमदू तेल्याच्या चुलत भावाच्या मेव्हण्याला तो पसंत पडला नाही... त्याला वाटलं त्याच्यावर अन्याय होतोय. त्यानं काही ऐकलंच नाही. तिघांपैकी प्रत्येकालाच बैल आपल्या

---

३. शरीअत : इस्लामी कायदा, न्याय.

वाटणीला यावा असं वाटत होतं. मध्यरात्रीपर्यंत वादावादी चालली होती. शेवटी असं ठरलं की सकाळी अखेरची बोलणी करायची.

मी देखील उठलो. लाकडी शिडीवरून गोठ्यात पोचलो. बदरीनं त्याचं डोकं हलवलं. तसं वाटलं त्याच्या कानांचा आवाज झाला– वाटलं डोकं आपटून घेतोय जणू ! एवढ्यात तो जोरात हंबरला. माझी खात्री पक्की झाली की हा नक्कीच म्हमदू तेल्यासाठी रडतोय. मला त्याला म्हणावंसं वाटलं, 'बदरी तू दाणापाणी घेतलंस की नाही ? आणि हा म्हमदू तुला एकटा सोडून गेला कुठं ?' परंतु मी काहीच म्हटलं नाही. विचार केला हे कुणीतरी ऐकेल आणि सगळेच मग मला म्हमदू तेली म्हणून चिडवतील आणि तो तर मला मुळीच आवडत नव्हता.

रात्री मला गाढ झोप लागली. सकाळ होताच आईनं उठवलं. म्हणाली, "अरे बाबा उठ. हे लोक केव्हाचे शोधताहेत तुला. त्यांचा मामला एकदाचा मिटवून टाक बघू. मी लगेच उठलो आणि म्हमदू तेल्याच्या घरी गेलो. बघतो तर काय, नगरपालिकेचे दोन चार चांभार बैलाला दंडुक्याचा प्रसाद देत आहेत. बदरी मेला होता. त्याच्या आजूबाजूला म्हमदू तेल्याचे नातेवाईक आणि तिथे पंच उभे होते.

"हाय रे दैवा !" माझ्या तोंडून उद्गार बाहेर पडले, "काय झालं ह्याला!"

"हजरत ह्याला चारा मिळालेला नाहीय." एक चांभार उद्गारला.

"अरे परवापासून याला कुणी चारापाणी घातलं नाही का ?" मी म्हणालो आणि म्हमदू तेल्याच्या नातेवाईकाकडं बघू लागलो. त्यातला कुणीच काही बोलेना थोड्या वेळाने एक पंच म्हणाला, "अरे बाबा, याच्यासमोर चारापाणी टाकायचा कसा ? तो कुणाच्या वाटणीला येणार आहे ह्याचा निवाडा झालाच कुठं ? मग दुसरा उगीच कुणी कशाला फुकटचा दाणापाण्यासाठी खर्च करेल ?

मी गप्पगार झालो. माझा कंठ दाटून आला होता.

# गुंता झालेल्या केसांची मुलगी

फातीमाच्या केसांचा खावा वेडीच्या केसांप्रमाणे गुंता होऊन पार जटा झाल्या होत्या. गफूरखाँ विचार करीत होता की बिचारीचं नशीब देखील तिच्या केसा-प्रमाणंच गुतागुंतीचं झालंय. निष्पाप पोर ! असा काय गुन्हा केलाय तिनं अखेर ? अशी काय चूक घडलीय तिच्या हातून ! गफूरखाँच्या हे लक्षात येत नव्हतं की फातीमाच्या नशीबाला कोणत्या राहूनं ग्रासलं होतं- कितीतरी वेडचा विद्रचाचं निभतं. दोन कवडी नसलेल्यांच्या जीवनातही प्रेमिक येतात. मग इथंच कसा अंधार आहे ?

गफूरखाँ कालीनबाफ[1] होता. गालीचा विणायच्या एका कारखान्यात तो वस्ताद- कुशल विणकर- म्हणून वरेच दिवस होता. एका दिवशी मुंशी[2] बरोबर मजुरीवरून भांडण झालं. कित्येक दिवसाच्या मजुरीच्या हिशोबाचा मेळ वसत नव्हता. यावरून दोघांमध्ये भांडण जुंपलं होतं मुंशीजीनं मॅनेजरसाहेबाकडं तक्रार केली होती. परिणामी साहेबांनी त्याला नोकरीवरून काढून टाकलं होतं. यानंतर कित्येक दिवस गफूरखाँ बेकारच होता. गालीच्याच्या विणकामाशिवाय त्याला कुठलाच धंदा जमत नव्हता. शेवटी एक दिवस बायकोचे सारेच दागदागिने त्याने विकून टाकले. सुरुवातीस त्याचं मन होत नव्हतं. कारण बायकोची अखेरची आठ-वण त्याच्याजवळ होती. पण शेवटी त्यालाही पोट होतंच. त्यासाठी सर्व काही विकून मिळालेल्या पैशातून त्यानं गालीचे विणण्याचा व्यवसाय सुरू केला.

मोहल्यातले सर्वच जण गफूरखाँची कदर करीत. सज्जन म्हातारं माणूस. अनु-भवी ! विनाकारण कुणाची स्तुती करणार नाही की कुणाला विनाकारण स्वत:ची स्तुती करू देणार नाही. पोरीबाळीचा किंवा इस्टेटीच्या तंटचाचा मामला असला की, गफूरखाँला हटकून सल्लामसलतीसाठी- न्यायनिवाडयासाठी बोलावून घेत. जे सत्य असेल ते तो तिथंच सांगून मोकळा होत असे. म्हणून सर्वजण त्याचा आदर करीत. त्याला कलामुल्लाह[3] तोंडपाठ होतं, मशिदीत इमामाच्या मागे पहिल्याच रांगेत त्याचं स्थान निश्चित असायचं ते यासाठीच. इमामाकडून एखादी चूक झाली, तर गफूरखाँ सुभान अल्लाह म्हणून आठवण करून द्यायचा. मात्र गफूर-खाँच्या पोरीसाठी अजून एकही स्थळ येत नव्हतं. आणि हे असं का ते गफूरखाँला समजत नव्हतं. वेडचाबिद्रचा मुलींची लग्न होतात. तर मग माझ्याच पोरीनं काय

---

१. कालीनबाफ : गालीचा विणणारा कारागीर.

२. मुंशी : कारकून.

३. कलामुल्लाह : कुराण.

अपराध केलाय ? तशी फातिमा वयानं फार मोठी नव्हती. गफूरखाँचं तर म्हणणं होतं ती किशोरी आहे. तिच्या आईसारखीच अंगापिंडानं ती जरा थोराड आहे. तिच्याप्रमाणे तिच्या आईचीही ठीक अशीच उंच मान होती. आणि असेच भरीव खांदे. शरीरानंही ती उंच होती. हुबेहूब फातिमासारखा होती ती. जणू काही एकाच सफरचंदाच्या दोन वेगवेगळ्या फोडी ! तिलादेखील माझ्याच नशिबाने दगा दिला. गफूरखाँ विचारात गर्क होता. त्याची ती एक सवयच होती. कुठल्याही बाबतीत त्याला हार खावी लागली की, तो स्वतःच्याच नशिबाला दोष द्यायचा. मनातल्या मनात पुटपुटायचा : माझंच नशीब फुटकं म्हणून फातिमाची आई मेली. नाही तर तिनं अशी कोणती दुनिया बघितली होती ? अजून तर तिचं भातुकली खेळायचं वय होतं ! जेव्हा जेव्हा तो फातिमाशी बोलायचा तेव्हा तेव्हा त्याला तिची आठवण यायची. तो फातिमाला म्हणायचा, " समजलीस पोरी, माझं स्वतःचं नशिबच फुटकं, नाही तर तुझी आई कशाला सोडून गेली असती आपल्याला. "

फातिमा निरुत्तर व्हायची. आईच्या आठवणींनी तिचे डोळे भरून यायचे आणि ती मनातल्या मनात म्हणायची, " नाही अब्बाजान, तुमचं नाही, माझंच नशीब फुटकं म्हणून ती आम्हाला दुरावलीय. मीच कमनशिबी तिच्या मुळावर आले. " पण हे सर्व ती मनातल्या मनातच म्हणायची. बापाला बोलून दाखवण्याइतपत साहस तिच्याजवळ नव्हतं. फारच सुशील आणि सद्‌गुणी होती फातिमा. मोहल्ल्यातील सर्व बायका तिच्या या गुणांचं कौतुक करीत. त्यांच्या पोरी जर जोरात हसू लागल्या वा धाडधाड करीत जिना उतरू लागल्या तर त्यांना चार शहाणपणाचे शब्द सुनावत त्या फातिमाचंच उदाहरण देत म्हणत : ती गफूरखाँची फातिमा बघा, उभ्या मोहल्ल्यात तिच्याबद्दल काहीतरी ऐकू येतं का ? सुख, ऐश्वर्य लाभेल ते अशाच पोरीला.

मात्र फातिमासाठी कुणी पाहुणा येत नव्हता चौकशीला. कुणी अनोळखी स्त्री कधी मोहल्लेवाल्यांशी विचारपूस करताना दिसायची नाही की– " हे गफूरखाँ कोण आहेत बरं ? असं ऐकलंय की त्यांना एक मुलगी आहे लग्नाची. कशी आहे बरं ?" गफूरखाँची हीच एकमात्र इच्छा होती. रात्रंदिवस या काळजीनं त्याचं हृदय पोखरून निघत होतं. असा कसा हा अंधार. अखेर कारण तरी काय असावं या साऱ्या मागं ? कित्येकदा त्याला वाटायचं की स्वतःच जावं आणि म्हणावं, " फातिमासाठी एखादं चांगलं स्थळ बघा ना. तुमचीच तर लेक आहे– नाही का?" परंतु तो जाऊ शकत नव्हता. त्याचे पाय जागचे हलायचेच नाहीत. ही तर शरमेची बाब आहे– मुलीला मागणी घालायला तर ते येतात, इथून आपण होऊन मुलीला दाखवायला घेऊन कोण जाईल ! त्यापेक्षा पोरीच्या गळयात धोंडा बांधून तिला समुद्रात बुडविलेली काय वाईट ?

एक दिवस तो मशिदीतून बाहेर पडत होता. तेवढ्यात बाहेरच एका बिचौलीशी[४] त्याची गाठ पडली. तिनं गफूरखाँला सलाम केला. तसं गफूरखाँ ओठातल्या ओठात हळूच पुटपुटला, "आता जरा याही पोरीसाठी स्थळ बघा ना. तशी पुष्कळ घरं मिळतील, पण तुझी बात काही और आहे." "ही काय सांगायची गोष्ट आहे, जे सुख हिला मिळावं म्हणून मी प्रयत्न करतेय, त्याचं श्रेय तर मला मिळेल, परंतु चांगलं घर मिळेल तेव्हा ना!"

"ते सर्व ठीक आहे. पण माझं एवढं लक्षात ठेवशील ना?"

एवढं म्हणून गफूरखाँ घराकडे निघाला. त्याला वाटलं आपल्या खांद्यावरचं एक मोठं ओझं खाली उतरलं. आतल्या आत तो सुखावला. जणू काही थोड्याच वेळात फातिमाची वरात येणार होती.

बऱ्याच दिवसांनंतर बिचौली गफूरखाँच्या घरी गेली. गफूरखाँ दुकानावर बसल्या बसल्या आपल्या छोट्या शिष्याला विणकारीचा धडा देत होता– "दोन पिवळे, एक अनारी, दोन पांढरे, तीन काळे (धागे) हा असाच क्रम ठेवायचा.." त्यानं बिचौलीला घराकडे येताना बघितलं आणि तो झटकन उठून उभा राहिला. त्याचे पाय जमिनीवर ठरतच नव्हते. जणू वरात त्याच्या दारात येऊन पोहचली होती. फातिमानं चटकन समावरीत[५] विस्तव घातला. तिच्यासाठी बाकिरखानियाँ[६] मागवली. बिचौलीनं विलायची घातलेली कॉफी घेतली. नंतर ती म्हणाली, "एक घर आहे माझ्या नजरेत. मात्र मुलगा थोडा लहान आहे." गफूरखाँ वेडपटासारखा उद्गारला - 'तर काय झालं, पाळण्यातलं मूल काय शेवटपर्यंत पाळण्यात थोडंच राहतं!"

"पण एवढी घाई कसली झालीय?" बिचौली म्हणाली. तसा गफूरखाँ स्वतःच्या उतावळेपणावर शरमिंदा झाला. बिचौली पुन्हा म्हणाली, "काश्मिरमध्ये[७] काय अकराच घरं शिल्लक राहिलीत काय? कुठं ना कुठं जमून जाईल; असं कधी घडलंय का की, पोरगी जन्मभर अशी पडून राहिलीय?" गफूरखाँ डोकं हलवत हो ला हो करीत होता. कॉफी पिऊन बिचौली निघून गेली. दोन दिवसांनी ती पुन्हा परत आली आणि म्हणाली, "आणखी एका घरची मंडळी मुलगी पहायला येणार आहेत."

---

४. बिचौली : मध्यस्थ स्त्री.

५. समावरी : चहा करण्याचं वा पाणी गरम करण्याचं तोटीचं भांडं.

६. बाकिरखानियाँ : एक खाद्यपदार्थ.

७. 'काश्मिरमध्ये काय...' पठाणांच्या शासनकाळात काश्मीरमध्ये भयंकर जनसंहार झाला होता. जनश्रुती अशी आहे की फक्त अकराच कुटुंबं काय ती शिल्लक होती. बाकीचे पठाणांच्या अत्याचाराला बळी पडले होते.

फातिमानं घरात झाडलोट केली. सडासारवण केलं. गफूरखाँनं मटन वगैरे मागवलं आणि पाहुण्यांसाठी स्वयंपाक केला. शेवटी येणारे पाहुणे उद्याचे व्याही आहेत. पहिल्यांदाच नाक मुरडण्याची वेळ येऊ देता कामा नये. वाट पाहून पाहून फातिमा अवघडून गेली. गफूरखाँची देखील तीच गत झाली. परंतु कुणीच आलं नाही. खूप उशीरा बिचौली आली. आणि सांगू लागली..." अरे भैय्या ते लोक म्हणतात की मुलाच्या मागण्या पूर्ण व्हायला हव्यात. त्यांना घड्याळ हवं. सूट हवा आणि हो, सायकलदेखील. म्हणूनच मी ते स्थळ नाकारलं. हे बघ भैय्या, आपल्यासारख्यांना हे सगळं परवडण्यासारखं आहे का ?" गफूरखाँ गप्प बसला. बिचौली जेवली आणि निघून गेली.

बरेच दिवस बिचौली जणू अदृश्य झाली होती. दर दिवशी गफूरखाँ विचार करायचा की आज येईल उद्या येईल. पण तिचा काहीच ठावठिकाणा लागत नव्हता. शेवटी एका दिवशी एक दोघांना घेऊन ती दाणकन हजर झाली. गफूरखाँ त्यांना बघून चपापला. पाहुणेमंडळी ही अशी अचानक येऊन टपकतील असा विचारच त्यांच्या मनाला कधी शिवला नव्हता. घाईघाईनं तो उठला आणि त्यानं कॉफीची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था केली. चुलीजवळ बसून बिचाऱ्या फातिमाचे मात्र चांगलेच हाल झाले. जेवणखाण झाल्यावर वरपक्षाच्या एका स्त्रीनं नाक मुरडून बिचौलीला काहीतरी सांगितलं. गफूरखाँनं चेहऱ्यावरून सर्व काही ताडलं. त्यानं विचार केला–' शेवटी हाही वार असाच गेला. ' तो नख-शिखान्त थरारला. ते लोक गेल्यावर बिचौली म्हणाली, " अरे भैय्या, गोळी मार या लोकांना. ह्यापेक्षाही चांगली स्थळं मिळतात. काही झालं तरी मुलं-मुली भर बाजारात मांडून ठेवलेल्या वस्तूच होत !"

" मुलं–मुली म्हणजे भर बाजारात मांडून ठेवलेल्या वस्तूच होत ! ' गफूरखाँ पुटपुटला आणि स्वतःचं समाधान करू लागला. ' दहा गिऱ्हाइकं येतील आणि दहा जातील. कधी ना कधी जमून जाईल. हा सर्व नशीबाचा खेळ आहे बाबा. ज्या कोणाच्या भाग्यात ही पोर आहे, ज्याच्या बरोबर हिची दैवानं गाठ मारली असेल तो स्वतःच येईल शोधत शोधत सरळ या दाराशी आणि त्यावेळी मग एका क्षणात सर्व काही गोड होईल. "

परंतु बऱ्याच दिवसांत कुणीच फिरकलं नाही. गफूरखाँ पुन्हा निराश झाला. त्याच्या मनात आलं काश्मिरमध्ये अकराच घर शिल्लक राहिलीयत. आणि त्या सर्वांवर आपली नजर आहे. त्यातील कोणाचा तरी होकार रुकार येईल याच आशेवर आपण आहोत. त्याच्या मनात आलं भरलेल्या बाजारात आपण बसलोयत आणि सौद्याची वस्तू म्हणून बसलीय फातिमा. खरेदीदार येताहेत जाताहेत. माल निरखून पाहताहेत. पण का कुणास ठाऊक हा माल त्यांना पसंत पडत नाहीय. नाकं मुरडून ते सरळ पुढं जाताहेत. एक एका ग्राहकाच्या जाण्यानं आपल्याला

धक्का बसतोय. असं झालं तर मालाचा भाव खाली येत जाईल. त्याला आपण काय करणार ?

गफुरखाँला समजतच नव्हतं की फातिमात कसली काय उणीव आहे; काय कमी आहे ? तिच्यात कुठलं शारीरिक व्यंग आहे ? स्वतःच्या आईसारखी ती उंच आणि सुडौल नाहीय ? तिचे केस लांबसडक आणि दाट नाहीयत ? तर मग काय भानगड आहे हेच त्याला उमजत नव्हतं. आणि तो या सगळ्यांसाठी आपल्या भाग्यालाच दोष देत होता.

एका दिवशी बिचौली हजर झाली. मोठ्या खुशीतच गफूरखाँच्या घरात प्रवेश करीत ती म्हणाली, "एक स्थळ मी बघितलंय. काय सांगू कसं ते ! बस्स ! मुलीचं भाग्य हवं भाग्य ! तिथं जे सुख तिच्या नशिबी येईल–देव करो, माझ्या पोरीच्या ते नशिबी येवो– ! मोठं घराणं, सज्जन लोक. हा, तुला मात्र थोडा त्रास घ्यावा लागेल भैय्या !"

"तो कोणता ?" गफूरखाँ जरा मोठ्यानंच म्हणाला. त्याला खात्री वाटू लागली, हो न हो, अल्लानं आपल्या पोरीसाठी हेच स्थळ निवडलं असावं.

"भैय्या, गोष्ट अशी आहे की, तुला चांदी नव्हे तर सोनं द्यावं लागणार त्यांना. तसे ते पोरीच्या लग्नाचे कपडेलत्ते देतीलच, या बाबतीत ते फारच सज्जन लोक आहेत. एवढे सज्जन की, पीरजादे देखील त्यांचा मुकाबला करू शकणार नाहीत ! मात्र तुम्हालाही नवऱ्या मुलाची कदर करावीच लागेल. त्यात तुझ्याच पोरीचं भलं आहे–म्हणेनास !"

एवढं बोलून बिचौली निघून गेली. गफूरखाँ विचार करू लागला की, एवढ्या वस्तू जमवायच्या कशा ? तिकडे बिचौलीला तर पक्का रुकारही देऊन टाकला होता. मग कसलासा विचार करून त्यानं दीर्घ श्वास घेतला. आणि फातिमाला म्हणाला, "पोरी, जरा तो हुक्का आण बघू." हुक्का घेऊन फातिमा त्याच्या समोर आली, तसं गफूरखाँच्या कल्पनेत तिचं वधूरूप साकार झालं. पौर्णिमेचा चंद्रदेखील त्या दिवशी हिला पाहून लाजेल. आईसारखीच ती शालीन आणि गुणी होईल. सासरची शोभा वाढवेल. परवरदिगार करो आणि हिला असं सासर मिळो की जिथं हिचं कोडकौतुक पुरवलं जाईल. बिचारीनं माहेरी फार दुःख सोसलंय. आई गेल्यावर साऱ्या घराचा भार हिच्यावर येऊन पडला. बिचारी निष्पाप निरागस पोर !

एक दिवस गफूरखाँनं दोनचार मजूर लावून घरातला गालिचा बनवायचा कारखाना काढून टाकला. शिकावू पोऱ्यालाही काढून टाकलं. घरातली जी जी फालतू चीज असेल ती ती विकून टाकली. घरातली भांडीकुंडी, केटली, डेकची जे हाताला लागेल ते विकून टाकलं आणि पैसे जमविले. गफूरखाँ फातिमाच्या लग्नासाठी एक एक वस्तू गोळा करू लागला. त्याने सोन्याचे झुमके घेतले. दोन चार बांगड्या आणि चारपाच अंगठ्या घेतल्या. इतरही अनेक लहान मोठ्या वस्तू

घेतल्या. आता तो बिचौलीची वाट पाहू लागला. पोरीचा एकदा साखरपुडा झाला आणि ती सासरी गेली म्हणजे निश्चित वसता येईल.

काही दिवसांनी बिचौली आली. गफूरखाँ खूश झाला. तिच्याशी खूपखूप बोलायचं होतं त्याला सांगायचं होतं की बाप असून पोरीला कधी आईची आठवण येऊ दिली नाही. लग्नासाठी एकेक करून सगळं सामान जमवलं. शीरनीदेखील घ्यायला विसरलो नाही. मात्र यातलं बिचौलीनं काहीच ऐकलं नाही. ती बसलीदेखील नाही. उभ्या उभ्याच तिनं विचारलं, 'काय भैय्या, तुझी पोरगी थोडी तरी शिकली सवरली आहे की नाही ? '

'' हां, हां कुराण शरीफ, करीमा-नामे-हक, जँगे जंतून...''

'' अरे नाही, मला म्हणायचंय कधी शाळेत गेली होती की नाही ? ''

'' नाही.'' गफुरखाँ निरुत्तर झाला.

'' झालं असं की त्यांचा पोरगा अनपढ मुलीशी लग्न करायला तयार नाही–''
एवढं सांगून बिचौली निघून गेली. गफूरखाँला समजत नव्हतं की, आता करावं तरी काय ? तो फक्त हाच विचार करू लागला की फातिमाच्या नशीबाचादेखील तिच्या केसासारखाच गुंता होऊन पडलाय.

# सुतळीचा तोडा

तांवडं फुटताच लोक इदगाहच्या दिशेने जाऊ लागले. सत्तार परे देखील सकाळीच झोपेतून जागा झाला होता. त्याने धुतलेले कपडे घातले आणि वासे-वाल्याचा निरोप घेतला. मग गोठ्यातून एक कोकरू काढून तो काठी टेकत मोठ्या कष्टाने लंगडत निघाला.

सत्तार परे 'मराज' (दक्षिण काश्मिर)चा राहणारा होता. त्याच्या गावात तीनच टोळ्यांचे लोक राहत होते : 'ख्वाजा', 'परे' आणि 'डोम.' सात आठ वर्षांपूर्वी या गावात ख्वाजांचं राज्य होतं. मोहल्ला अधिकारी हेच नंबरदार आणि जेलदारही हेच. सत्तार परेला सुरवातीपासूनच या लोकांबद्दल घृणा होती. स्वतः-कडून होता होईल तेवढा विरोध या ख्वाजांचा अधिकार आणि दादागिरीविरुद्ध तो प्रकट करीत असे, परंतु त्याची कुठलीच मात्रा चालत नसे. बदला घेण्याचा भावनेने हे ख्वाजे लोक डोमांच्या हातून त्याची धुलाई करीत असत. परंतु राज्य बदललं आणि मोहल्ला अधिकारी, नंबरदार, जेलदार हे लोकांच्या मतानुसार निवडू लागले. सत्तार परे बेहद्द खुष झाला. त्यानं तमाम परे टोळीच्या लोकांना संघटित केलं. त्यानं डोमांनादेखील निरोप पाठवून आपली योजना कळवली आणि त्यांना आपल्याकडं वळवून घेतलं. शेवटी रसूल नावाडी झाला. मोहल्लाअधिकारी आणि नम्बरदार झाला सत्तार परे. परंतु सत्तार परेवर विधात्याची कृपादृष्टी अधिक दिवस टिकू शकली नाही. एका दिवशी सफेदाच्या फांद्या तोडत असताना तो झाडा-वरून खाली पडला. सारा गाव गोळा झाला. त्याच्या ढोपराची हाडं पार तुटली होती. सगळ्यांनी त्याला घरी पोहचविला आणि मालीशवाल्याला बोलावलं. पीर फकीराचा इलाजदेखील झाला, पण सत्तार परे बरा झाला नाही. शेवटी त्याला शहरात पोहचविला. शहराच्या दवाखान्यात त्याचा एक पाय कापण्यात आला. तेव्हापासून सत्तार परे एका पायावर आणि काठीचा आधार घेत चालू लागला.

सत्तार परे चालताना 'अलूफ–अकबर अलूफ अकबर लाईलाइल्ललाह, अलूफ अकबर'चा[१] जप करत होता. कोकरू बँ बँ करीत त्याच्यामागून जात होतं. त्याच्या गळ्यात दावं अडकविलेलं होतं, त्याचं दुसरं टोक सत्तारच्या हातात होतं. लोक पायी, टांग्याने, मोटारगाडीने आणि बसमधून जात होते आणि गर्दीतून चालताना सत्तार परेला बराच त्रास होत होता.

या कोकराला सत्तार परेनं ईदच्या दोन दिवस आधी गावाकडून आणलं होतं आणि अरफ्याच्या[२] दिवशी तो बासेवाल्याकडं उतरला होता. त्याचं शरीर आता

१. अल्ला हो अकबर.

२. नैवेद्य दाखवण्याचा दिवस.

थकलं होतं– काहीसं म्हातारपणामुळं, काहीसं रोगामुळं आणि काहीसं संसाराच्या ओझ्यामुळं. अल्लानं म्हातारपणात त्याच्या चौथ्या पत्नीची कूस उजवली होती. पहिल्या दोन बायका मरण पावल्या होत्या. तिसरीला त्यानंच सोडली होती. त्या तिघींपासून झालेलं एकही मूल जगलं नव्हतं शेवटी त्यानं स्वतःच्या जन्मगावी लग्न केलं होतं. तिच्यापासून दोन मुलं आणि दोन मुली झाल्या होत्या. आणि ती चारही अपत्यं जिवंत होती. खरं म्हणजे या मुलाच्या तोंडाकडं पाहूनच सत्तार परे जगत होता. परंतु मुलांसाठी शेवटी कपडालत्ता, भाजीभाकरी तर हवीच ना ? आणि हेच सत्तारला जमवता येत नव्हतं. खरं म्हणजे सर्व काही करता आलं असतं पण करणार काय, त्याचं शरीर त्याला साथ देत नव्हतं.

सफाकदल (श्रीनगरमधल्या एका पुलाचं नाव) ओलांडताना सत्तार परेला आपल्या ऐन तारुण्यातले दिवस आठवले. कसा गबरू जवान होता तो. पीळदार शरीर, लालबुंद चेहरा, गावातला कुठलाच तरुण त्याच्या खिजगणतीत नव्हता. त्याला आठवलं, ख्वाजा टोळीच्या लोकांबरोबर तो एकटाच लढला होता, पण त्याच्या समोर कुणी टिकेल तेव्हा ना ! हां– पण जेव्हा ख्वाजे डोमांना हुसकावून लावून पुढे चाल करीत तेव्हा मात्र कधी कधी त्याला दबून राहावं लागत असे. तारुण्यात त्याचं एकही अपत्य जिवंत राहिलं नव्हतं. किती आवड होती त्याला मुलाबाळांची ! एक लांब सुस्कारा टाकत स्वतःशीच तो म्हणाला– 'खुदा की खुदाई !' दात आहेत तर चणे नाहीत. चणे आहेत तर दात नाहीत. पुत्रप्राप्तीची इच्छा तर रब-उल आलमीननं पूर्ण केली होती, मात्र त्याचं शरीर साथ देत नव्हतं. पुन्हा त्यानं हळूहळू 'अलूफ-अकबर अलूफ अकबर'चा जप सुरू केला असेल नसेल तोच त्याला तो नवा नंबरदार झाला आणि सफेदाच्या झाडावरून पडला तो दिवस आठवला. सत्तार परेनं मनातल्या मनात विचार केला. जरूर मला ख्वाजा लोकांचा तळतळाट बाधला असावा, नाहीतर मी चांगला ठणठणीत होतो ना ! त्याला हसू आलं की कसे हे ख्वाजा लोक ! नंबरदारी आणि मोहल्लाअधिकारी या दोन्ही दोन्ही गोष्टी खिशात बाळगून होते.

त्याला आणखी एका दिवसाची आठवण झाली. जेव्हा कबाइल्यांनी काश्मीरवर आक्रमण केलं होतं. कबाली अजून पोहचलेले नव्हते तोच बलपुऱ्याचा गनबट, छोटे अलीबटचा पोरगा मुल्ला आणि रसुला तुर्रे बांधून पठाण बनून लोकांना लुटण्यास निघाले होते. त्यांनी पुष्कळ समजावून सांगितलं होतं —अबे बो सत्तारा, चल आमच्या बरोबर, असा मोका पुन्हा पुन्हा येत नसतो. चल नीघ. मग आयुष्यभर मौजमजाच करायची आहे. मात्र सत्तारनं त्यांचं म्हणणं ऐकलं नाही. त्याला विश्वास होता की अल्लाताला कधी मोताज करणार नाही आणि आज... आज मात्र एक पाय निकामी झाल्यामुळं तो कुठलंच काम करू शकत नव्हता. इतकंच नव्हे, तर त्याला घरातील सर्व चीजवस्तू विकून टाकाव्या लागल्या

होत्या. सध्याच्या परिस्थितीत म्हणूनच त्याचा विश्वास डळमळू लागला होता.

सत्तार परे पुन्हा 'अलूफ-अकबर अलूफ अकबर' जपू लागला. पूल त्याने केव्हाच ओलांडला होता. पुढच्या दुसऱ्या टोकापासूनची सडक अरुंद होती आणि गर्दी अफाट. धक्काबुक्कीशिवाय पुढं जाणं मुश्किल होतं. चालताना सत्तार परेला बरेच कष्ट पडत होते. मागं मागं येणारं कोकरू दावं तोडून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होतं. पण त्यानं दावं हातात गच्च पकडलं होतं आणि फरफटतच तो त्याला नेत होता. एकदा तर कोकरानं जोराचा हिसका मारला तसं दावं तुटून एक टोक सत्तारच्या हातात राहिलं. गर्दी नसती तर ते नक्कीच पळून गेलं असतं. पण गर्दीतल्याच एकानं त्याला पकडून सत्तारच्या हवाली केलं. आता सत्तार त्याची मानगूट धरून चालू लागला. त्याला धाप लागली. त्याला तंबाखूची प्रचंड तलफ आली.

तो घळीतल्या घराच्या पुढं पोहचला. येथील रस्ता अपेक्षेपेक्षा थोडा अधिक रुंद होता. चालायलाही सोपं जात होतं. तो चालत होता आणि मनात अनेक विचारांची गर्दी उसळली होती. तसा त्याला रस्त्यात सुतळीचा एक तोडा पडलेला दिसला. त्यानं विचार केला. कोकराच्या गळ्याला बांधायला उपयोगी पडेल. शरीराचा सारा भार काठीवर टाकून तो झुकला आणि तो तोडा उचलला. कमर सरळ करण्यासाठी त्यानं जरा शरीराला हळुवार झटका दिला तशी त्याची नजर उजव्या बाजूच्या एका दुकानावर पडली. तेथे ख्वाजा अहमद बट उभा असलेला पाहून तो थरारला. त्याची विचार करण्याची शक्तीच नष्ट झाली आणि लगेच त्याने सुतळीचा तोडा फेकून दिला. पण पुन्हा विचार आला —'हॅं, माझं काय बिघडवणार आहे?' आणि वाकून त्यानं सुतळी पुन्हा उचलली आणि पुढं सटकला.

ख्वाजा अहमद बट त्याच्या गावचा जुना नंबरदार होता. सत्तारनं त्याच्याकडून त्याची नंबरदारी छिनून घेतली होती. दोघेही मनात एकमेकांवर जळत होते. सत्तार परेनं त्याला बघितलं तसा त्याला घाम फुटला. त्यानं विचार केला, आज ख्जाजा–टोळीला समजणार की सत्तार परे पार धुळीला मिळालाय. आजवर त्यानं आपले मिशीचे आकडे कधी कोणासमोर खाली होऊ दिले नव्हते. नेहमी ताठ मानेनं वागला होता. पण वेळ काय नेहमीच सारखी असते? चार दिवस सासूचे तर चार दिवस सुनेचे! त्यानं सरळ निघून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु अहमद बटनं त्याला हाक मारलीच 'काय महाशय, याला इदगाहमध्ये बळी देणार काय? आमच्यासाठी देखील एखादी बट ठेवा.'

सत्तार परे समजला की थट्टा करतोय साला. मात्र त्यानं काहीच उत्तर दिलं नाही. मनात आलं : जर आज आपली ही अवस्था नसती, तर याला असं बोलायची आपण संधीच दिली नसती, त्यानं कोकराकडं डोळाभर पाहिलं– एका

बकऱ्याची कुर्बानी काही फार मोठी बाब नाही ! जेव्हा तो ऐन तारुण्यात होता आणि कमावीत होता तेव्हा नाही का तो बकरा कुर्बान करायचा ? पण आता कुठले ते दिवस यायला ? आज तर तो हे कोकरू विकून मुलांसाठी कपडेलत्ते घेणार होता. पैसे मिळाल्याशिवाय का मुलाबाळांची ईद साजरी होणार ?

सत्तारनं विचार केला, अर्ध्या पाऊण किमतीत विकून टाकावं आणि मग जुन्या-पुराण्या दुकानातून मुलांसाठी कपड्याची खरेदी करावी. झालंच तर पावभर मस्त मटणही घरी घेऊन जावं. दुनिया आज लाख ईद साजरी करीत असेल आपण मात्र उद्या साजरी करणार ! यात गुन्हा तो काय आहे ! अरे बडी ईद तर अडीच दिवस साजरी करतात. नव्या कपड्यांसाठी पोरांनी आईकडं हट्ट धरला असणार आणि चवैना–चिज्जीसाठीदेखील. खरं म्हणजे मुलांपेक्षा अधिक शेजारच्या बायकांनीच भंडावून सोडलं असणार तिला. एकेकीनं येऊन विचारलं असणार की, आज सणा-सुदीची चूल का नाही पेटवली ती ? पण ती चांगली समजूतदार आहे. उगाच नामुष्की होऊ नये, जगानं हसू नये म्हणून सकाळीच तिनं चुलीवर रिकामं भांडं पाणी टाकून ठेवलं असणार.

रस्ता अधिक रुंद असल्यामुळे सत्तार परे लांब लांब ढांगा टाकत चालला होता. कोकरूही सरळ चालत होतं. इदगाहचा पूल ओलांडून जसा तो मैदानात पोहचला, तसा समोरच एक दलाल दिसला. दलाल म्हणाला, 'अरे बाबा विका-यचं आहे की असंच आणलंस ?' सत्तार म्हणाला,

"होय बाबा विकायचं तर आहेच. पण सौदा तर पटला पाहिजे."

"तर सांग मग किती पैसे घेणार ? एकच भाव सांग बाबा."

सत्तारनं थोडा वेळ विचार केला आणि म्हणाला, "दुधाचे दात असणारं कोवळं कोकरू आहे. तीन पासऱ्या पडतील. इंग्रेजी तीन पासऱ्या !"

दलालानं कोकराचं तोंड उघडून दात बघितले. "तीन पासऱ्याचं तर दिसत नाही बाबा. वजन वाढावं म्हणून पाणी पाजलेलं दिसतंय. कळतं बाबा आम्हाला सारं." दलाल म्हणाला.

"नाही हजरत, खुदाची शपथ, मी बेइमानी नाही करत. कुराण साक्षी आहे."

"अरे सोड, कशाला उगाच शपथा वाहतोस ? सरळ सरळ सांग ना किती पैसे घेणार ते. पटला सौदा तर नगद दाम मिळेल– अल्ला अल्ला खैर सल्ला !"

क्षणभर सत्तार विचारात पडला की याला किती किंमत सांगावी. तेवढ्यात दवंडीवाल्याचा आवाज त्याच्या कानी आला. त्यानं तिकडं वळून बघितलं – एक चांभार ढोल बडवून ओरडत होता–

"साहेबान, हाजनचे हाजी सुभान हज्जाम यांचा बटवा हरवला आहे. त्यामध्ये पाचशे रुपये आणि काही महत्त्वाची कागदपत्रं आहेत. ज्या कुणाला सापडला असेल त्यानं जर तो पोलिस चौकीवर आणून दिला तर त्याला वीस रुपये बक्षीस

मिळतील." चांभार जरा पलिकडं जाऊन पुन्हा ओरडू लागला.

"आता सांग..." दलालानं सत्तारला विचारलं. सत्तार परे म्हणाला, "पंचवीस रुपये देऊन टाक. मी जास्त घासाघीस करीत नाही" भुवया वर चढवीत दलाल उद्गारला, "तुझं डोकं–बिक तर फिरलं नाही ना? शहरात सगळ्यांना मेंढीचं मटण आवडतं. बकऱ्याचं नाही. आणि हे कोकरू तर कुर्बानीलाही उपयोगी नाही. मी विचार केला होता, घरी नेऊन पाळावं म्हणून"

सत्तार म्हणाला, "पण तू तुझा भाव सांगशील की नाही?"

"मी जास्त बोलत नाही. पंधरा रुपये देईन. पटलं तर पैसे घे."

बराच वेळ घासाघीस झाल्यानंतर अठरा रुपयावर सौदा ठरला. सत्तार परेनं रुपये घेतले. नमाजाची वेळ झाली होती. तो घाईघाईनं "अल्लाह–अकबर अल्लाह अकबर" म्हणत निघाला आणि नमाजाला बसला.

नमाज संपली. इमाम साहेबांनी खुतबा वाचायला सुरवात केली. इकडे सत्तार मनातल्या मनात हिशेब करीत होता, या अठरा रुपयातून कपडे किती रुपयाचे घ्यायचे, मटण किती रुपयाचं आणि बायकोला काय घ्यायचं. समोर दोन तीन पोलिस उभे होते. त्यांनी विचारलं–

"तूच सत्तार परे आहेस का?"

सत्तार भीतीनं शहारला. जीभ जणू लुळी पडली. मोठ्या कष्टानं म्हणाला, "हां– हां. होय, पण का?" पोलिस काहीच बोलले नाहीत. त्यापैकी एकानं दुसऱ्यास सांगितलं, "तू जाऊन टांगा घेऊन ये. तोवर आम्ही इथंच थांबतो." एक पोलिस टांगा आणावयास गेला. बाकीचे त्याच्या बाजूला उभे राहिले. बघता बघता बऱ्याच लोकांचा घोळका तिथे जमला. काहीजणांनी पोलिसाना विचारलं देखील की काय झालं. पण ते गप्पच होते. मग लोकच आपापसात एकमेकांना विचारू लागले. पण कुणालाच धड समजेना. गर्दीतला एकजण दुसऱ्याला म्हणाला, "चल बाबा, भूक लागलीय. नक्कीच त्यानं काहीतरी केलं असणार. उगीच कोण कोणाला असं अडकवून ठेवणार?"

सत्तार परे विचार करू लागला की आपण असा कोणता गुन्हा केलाय? पोलिसांना विचारण्याची मात्र त्याची ताकद होईना. शेवटी एकदाचा टांगा आला. पोलिसांनी सत्तारला टांग्यात बसवलं आणि टांगा सरळ पोलीस चौकीकडे नेला. पोलीसचौकीसमोर एकजण पोलिसाला विचारत होता, "का हो, हेच आहेत का ते हजरत?"

पोलिस काही न बोलता नुसता हसला. सत्तार परेच्या अजून लक्षात येत नव्हतं अखेर मामला काय आहे तो.

सत्तारला ठाणेदार साहेबांसमोर उभं करण्यात आलं. ठाणेदारसाहेब फारच नेकदिल माणूस होता. नम्रतेनं तो सत्तारला म्हणाला,

" हे बघ भाऊ, चुपचाप बटवा काढून इथं ठेव आणि मग जा खुदाचं नाव घेत."

सत्तार दिङ्मूढ झाला. त्याला दवंडी पिटणारा चांभार आठवला–

" कोणता बटवा साहेब ? मला काहीच माहीत नाही !"

" हे बघ, सरळ सरळ काढून ठेव." ठाणेदार उत्तरला.

" नाही हजरत, पाहिजे तर माझी झडती घ्या. माझ्या खिशात फक्त अठरा रुपये आहेत आताच मी एक कोकरू विकलंय."

" ऐसी की तैसी तुझ्या कोकराची !" ठाणेदार गरजला " ह्याची झडती घ्या !"

झडतीत सत्तारजवळ अठरा रुपयांव्यतिरिक्त काहीच सापडलं नाही. पोलिस-वाल्यांनी ते अठरा रुपये हडपण्याचा प्रयत्न केला. पण ठाणेदारानं ऐकलं नाही. तो अजून तरुण वयाचा होता. कदाचित नुकताच नोकरीवर लागला असावा.

" हे बघ भाऊ, बटवा तू उचलला आहेस हे पुराव्यानिशी सांगणारा एकजण आमच्याकडे हजर आहे." ठाणेदार म्हणाला, " जर तू चुपचाप काढून दिलास तर वीस रुपये मी तुला बक्षीस देईन. आणि जर दिला नाहीस तर लक्षात ठेव, कायद्यापुढे कुणाची काही मात्रा चालत नसते."

" नाही साहेब, ला–इला इल्ल्लाह !" सत्तार परे त्याच्या पायाशी लोळण घेत म्हणाला, " मला खरंच काही माहीत नाही, कुराण साक्षी आहे."

ठाणेदार म्हणाला, " तू माजी नम्बरदार अहमद बट साहेबांना ओळतोस ?"

आत्ता सत्तार परेच्या लक्षात सर्व प्रकार आला. तो म्हणाला,

" हां, ओळखतो."

" तर मग त्यांनीच तुला बटवा उचलताना पाहिलंय. एक इज्जतदार सज्जन माणूस खोटं कशाला सांगेल ?"

" साहेब, मी बटवा नव्हता उचलला. मी तर फक्त सुतळीचा तोडा उचलला होता त्यांच्या समोर–"

ठाणेदारास हसू फुटलं. सगळे पोलिसवाले सत्तार परेच्या चलाखीवर हसू लागले. नकळत सत्तारने तो तोडा बोटाला गुंडाळला होता, तो त्याने एकदम काढून दाखवला व म्हणाला, " हे बघा साहेब, हाच तो."

ठाणेदार पूर्वीपेक्षा जोरात हसला आणि म्हणाला, " आमच्याशी चलाखी ? अरे असे किती तरी दसनम्बरी बघितलेत मी."

सत्तार जोरजोरात मान हलवून सारखा म्हणत होता, " नाही साहेब, गळ्याशपथ ! मी हाच सुतळीचा तोडा उचलला होता. कुराण साक्षी आहे–" त्याच्या पायाखालची जमीन सरकू लागली. त्यानं ठाणेदाराचे पाय धरले, " खरंच साहेब कुराण साक्षी आहे."

कुठून तरी अहमद बट साहेबांना शोधून आणण्यात आलं. त्यांनी साक्ष दिली

की सत्तारने बटवा उचलताना मी प्रत्यक्ष बघितलंय. सत्तार परेचं पुन:पुन्हा आपलं पालुपद सुरू होतं.

" कुराण साक्षी आहे साहेब, हा सुतळीचा तोडाच फक्त मी उचलला. "

ख्वाजा अहमद बट निघून गेला. ठाणेदारही निघून गेला. सत्तारला रात्रभर तिथंच डांबून ठेवलं गेलं. सकाळी पुन्हा ठाणेदार साहेबांनी चौकशी सुरू केली. पण त्याचं एकच उत्तर—

" मी फक्त सुतळीचा तोडा उचललाय, कुराण साक्षी ! "

तशी टेलिफोनची घंटी खणखणली आणि कुठून तरी सूचना आली की बटवा मिळालाय म्हणून. ते ऐकून सत्तार फारच खूष झाला व म्हणाला—

" बघितलं साहेब, मी काय खोटं बोलत होतो ? बा-खुदा मी तर सुतळीचा तोडाच उचलला होता."

कालच्यासारखं हसत ठाणेदार म्हणाला, " ठीकय जा, तुला सोडून देतोय " नंतर पोलिसाकडं वळत तो म्हणाला, " हा एकटा नसावा. मला वाटतं ह्याची टोळी असावी. त्यांना पत्ता लागला असेल त्यांच्यातल्या एकाला पकडलं म्हणून. आणि हा आपली नावं सांगेल ह्या भीतीनं त्यांनी बटवा परत केला असणार ! " सत्तारनं हे जेव्हा ऐकलं तसा तो परत फिरला आणि ठाणेदार साहेबांना म्हणाला,

" साहेब कालपासून मी शपथेवर शपथ घेऊन सांगतोय— तुमचा विश्वास का बसत नाही ? "

" तू जा रे आता इथून ? खुदाची मेहरबानी समज. पुन्हा भेट होईलच म्हणा. "

सत्तार लंगडत खाली आला. तो रस्त्यावर येऊन पोहचला तसा एक दुकानदार दुसऱ्याला सांगू लागला, " बघा, तो बघा. हाच तो. " सत्तारनं विचार केला की, यांना अजून आपल्याबद्दल शंका आहे. तो त्यांच्याजवळ गेला आणि सारी कर्म-कहाणी सांगितली. मग म्हणाला, " हा बघा हाच तो सुतळीचा तोडा कुराण साक्षी आहे ! "

" कशाला बनवतोस बाबा ? फुकट तोंडाची वाफ कशाला दवडतोस ? " एक दुकानदार म्हणाला.

" म्हातारपणामुळं डोकं फिरलंन् काय ? " दुकानदार उद्गारला.

" आम्हाला सांगतोय, अरे घरबसल्या उडत्या पाखराची पिसं मोजणारी माणसं आम्ही ! "

सत्तार तिथून निघाला. आता बासेवाल्याकडं जायला हवं. कदाचित त्याच्याही कानावर उलट सुलट गेलं असणार. कष्टानं लंगडत तो त्यांच्याकडं पोहचला. सलाम करून तोंड वेंगाडत सारा किस्सा ऐकवला आणि सुतळीही दाखविली.

वासेवाला मालक म्हणाला, " ते सगळं ठीक आहे पण यापुढे मात्र इथं नको येत जाऊस ! निष्कारण लोक म्हणतील की, चोरीच्या मामल्यात आमचाही हिस्सा असेल म्हणून. "

" अरे मी शपथ घेऊन सांगतोय की ही सुतळी तेवढी मी उचलली. कुराण साक्षी आहे. "

सत्तार परे तिथून निघाला. भुकेनं त्याचा जीव व्याकूळ झाला होता, मात्र डोक्यात आगडोंब उसळला होता. मनात आलं, जावं आणि अल्ल्या ख्वाजा टोळीच्या घरांना आग लावून द्यावी. या अहमद बटनं माझी पार बेअब्रू केलीय. साल्याच्या पीरच्या पोरीची...

शहरातून बस पकडून सत्तार गावी निघाला. बसमध्ये बरेच प्रवासी होते. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर सत्तार म्हणाला, " साहेब हो, काल मी हाच सुतळीचा तोडा उचलला "...... आणि त्यानं सगळी हकीकत पुन्हा ऐकवली. त्याला वाटलं ही माणसं आपल्याबद्दल सहानुभूती दाखवतील. पण व्यर्थ ! एक जण म्हणाला, " आजकाल तर स्वतःच्या हातावर देखील विश्वास ठेवता येत नाही. दुसरा म्हणाला, " कुणास ठाऊक, कदाचित आपल्यातच एखादा खिसेकापू बसला असेल. असल्या बिलामतीस काय शिंगं थोडीच असतात ?"

सगळ्यांनी त्याच्या हो ला हो केली आणि सत्तारकडं बघितलं. सत्तार उमजला की त्या साऱ्यांचा हा टोमणा आपल्याला उद्देशूनच आहे. आतल्या आत तो धुमसत होता. कुणाला काय सांगणार !

सत्तार परेच्या चोरीची गोष्ट शहरभर आणि गावभर पसरली. तो घरी पोहचला तसा एक एक जण येऊन विचारू लागला. तो प्रत्येकालाच समजावून सांगू लागला की, मी ही सुतळी उचलली होती, कुराण साक्षी आहे. सर्वजण त्याचे ऐकून बाहेर जात आणि म्हणत, " बंडल मारतोय. आणखी किती जणास बनवतो कुणास ठाऊक ? पावसावाचून कधी चिखल होतो का ? "

सत्तारनं बायकोला सतरादा समजावून सांगितलं की, बाई ग मी फक्त सुतळी उचलली. पण त्याला समजत नव्हतं की तिचा अजून का विश्वास बसत नाहीय. इतर कुणी नाही पण निदान स्वतःच्या बायकोनंही विश्वास ठेवू नये ! त्यानं उठून काँगडी[3] फेकून मारली तिला. पण नेम चुकला. नंतर सत्तार परेनं पोरालाही चोप दिला. त्याला वाटलं की या पोरांचा देखील आपल्यावर विश्वास नाहीय. कितीतरी वेळा तो अहमद बटचं घर जाळावयास निघाला. रात्रंदिवस त्याच्या टोळीला तो शिव्याशाप देत राहिला.

शेवटी हकीमानं उपाय सुचविला की, याच्या गळ्यात लाकडाचं लोढणं अडकवा.

---

३. काँगडी—उबेसाठी गळ्यात अडकण्याची काश्मिरी शेगडी.

सत्तार परेच्या गळ्यात लाकडी लोढणं अडकविलं गेलं. रडून रडून त्याच्या बायकोचे डोळे सुजले. तिची लहान पोरंही मेली. मात्र अजूनही सत्तार परेला उमजत नव्हतं की आपली बायको आपल्यावर विश्वास का ठेवीत नाही? तो दररोज तिला म्हणायचा, " हे बघ, हाच तो सुतळीचा तोडा आहे. कुराण साक्षी आहे. "

# कासवं

आमच्या देशात कासवं सापडत नाहीत. मात्र कासव कुठल्या प्राण्याचं नाव आहे हे मि. अब्दुल करीम एम. ए , एल्. एल् बी. साहेबांना माहीत होतं. ते अलीगढहून आग्र्याला ताजमहाल पाहावयास गेले होते तेव्हा त्यांनी यमुनेत कासवं पाहिली होती. त्यांना कासवाच्या ओंगळ रूपाची फारच घृणा वाटत होती. काळे कुरूप, लहान–लहान पाय, उपडचा उखळासारखी पाठ– जिच्याखाली हे प्राणी आपलं डोकं अन् शरीर लपवून बसत. जणू काही गंभीर चिंतन करताहेत !

मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. एल्. बी. साहेबांनी एम. ए. आणि एल्. एल्. बी.ची डिग्री अलीगढ विद्यापीठातून घेतली होती. त्यांनी बऱ्याच पुस्तकांचा वाचून फडशा पाडला होता. डार्विनचा विकासवादाचा सिद्धांत त्यांना तोंडपाठ होता. जगाचं चित्र नेहमीच त्यांच्या डोळ्यांसमोर असे आणि त्यांना हेही ठाऊक होतं की जर्मन युद्धात हिटलरने कोणकोणत्या देशांचा धुव्वा उडवला आहे. त्यांनी ॲरिस्टॉटल आणि अरिफस्तूनची फिलॉसाफी वाचली होती. अणूत किती शक्ती आहे याचंही ज्ञान त्यांना होतं. कायद्याच्या अनेक किचकट बाबी त्यांना पूर्णपणे समजलेल्या होत्या. आणि शेक्सपिअरची सारीच नाटकं त्यांनी मुखोद्गत केली होती. चांदण्यारात्री त्यांनी ताजमहाल पाहिला होता. लाल किल्ल्याची खोली न् खोली धुंडाळली होती आणि कुतूबमीनारच्या पायऱ्याही मोजल्या होत्या. अजिंठ्याच्या चित्रकलेचं त्यांनी सूक्ष्म अवलोकन केलं होतं. त्याना माहीत होतं की अवंतीपूरला 'अवंतीपूर' हे नाव का पडलं आणि पट्टण कुठल्या राजाची राजधानी होती. याच सर्व कारणांमुळे त्यांना आता मोहल्ल्यातल्या सर्वांची चीड येऊ लागली. गावढळ, मूर्ख लेकाचे– जग कुठं चाललंय ह्याचा पत्ता नाही ! ते कुणाशीही बोलत चालत नसत. हां, कोणी सलाम केलाच तर उत्तरादाखल फक्त डोकं हलवित असत. मोहल्ल्यातल्या सर्व लोकांचं म्हणणं होतं की उच्च शिक्षणामुळं त्यांचं डोकं फिरलं आहे. स्वत:शिवाय अन्य कुणी त्यांच्या खिजगणतीत नसायचा. मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. एल्. बी. साहेब विचार करीत की, शेवटी या लोकांशी बोलावं तरी काय ! मोहल्ल्यात एक तरी असा आहे का की ज्याला गुंजभर तरी अक्कल आहे ? जगाबद्दल माहिती असणारा एक तरी आहे का ? शिकलं सवरलेलं कुणी नाहीच मुळी इथं. उपडचा उखळाखाली डोकं अन् शरीर लपवून साऱ्या दुनियेशी बेखबर असणाऱ्या कासवासारखे आहेत सगळे.

मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. एल्. बी. साहेब रोज सकाळी आठ वाजता उठत. उन्हाळा असो वा हिवाळा, गरम पाण्याने तोंड धूत. त्यानंतर ते चहा पीत आणि चहा पीत पीत वर्तमानपत्र वाचत असत. बरोबर नऊ वाजता सायकलवर

स्वार होऊन ऑफिसला जाण्यासाठी ते घराबाहेर पडत आणि तेथे सरळ आपल्या केबिनमध्ये जात. साडेतीन वाजेपर्यंत केबिनमध्ये भेटण्याची कुणालाच परवानगी नसे. ऑफिसमधून सरळ ते निडोज हॉटेलात जात– आणि वेगळ्या खोलीत बराच वेळ चहा पीत बसत अथवा मदिरापान करीत. नाही तर कधी कधी नुसताच विचार करीत. संध्याकाळी ते उशीराने घरी परतत. आणि वेगळ्या खोलीत बसून पुस्तकं वाचत. सगळं जग झोपी गेल्यावर मग ते झोपत असत.

अलीगढला उच्च शिक्षण घ्यायला जाण्यापूर्वी ते कॉलेजमधून सरळ घरी येत असत. चहा वगैरे झाल्यावर रसूल शिंप्याकडे जाऊन दोन तीन तास बसत. अर्थात ही त्या दिवसांची गोष्ट आहे, रसूल शिंप्याच्या दुकानावर मोहल्ल्यातले आणखी दोघे तिघे जमत असत आणि सुखदुःखाच्या गोष्टी करीत बसत. मि. अब्दुल करीम त्यांना सर्व जगाच्या बातम्या ऐकवत आणि त्यावर ते टीका– टिप्पणी करीत. रसूल शिंप्याच्या दुकानावर दुसरं महायुद्ध संपण्याच्या फार पूर्वी त्यांनी ही घोषणा केली होती की हिटलरचा पराभव अटळ आहे. त्या सर्वांचं असं प्रामाणिक मत होतं की, जो देश स्वतःच्या स्वार्थापोटी जगाची शांती नष्ट करेल त्याचा पराभवही अटळ असणारच. कारण जगातील सर्वच लोक त्याच्या विरुद्ध असणार. त्यावेळी मोहल्ल्यातील सर्वच लोक मि. अब्दुल करीमला फार मान देत असत. ते सुशिक्षित आणि विनम्र होते. मोहल्ल्यातील सुखदुःखाच्या प्रसंगी वा लग्नाविग्नाच्या वेळी ते हमखास हजर राहात. ते हजर असले म्हणजे प्रसंगाची शोभा आणखी वाढत असे. शिक्षणाचा उपयोग दैनिक जीवनात कसा करायचा याची त्यांना जाण होती. तेव्हा सर्वचजण त्यांना आदराने अब्दुल करीम म्हणून बोलावित असत. परंतु अलीगढहून उच्च शिक्षण घेऊन परतल्यापासून त्यांनी लोकांना भेटणं बंद केलं. तेव्हापासून जणू काही त्यांचं डोकं फिरलं. जीवनाच्या प्रवाहातून स्वतःला वेगळं करून ते पुस्तकाच्या जगात वावरू लागले. त्यामुळे लोक त्यांची थट्टा करू लागले. आणि मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. एल्. बी. म्हणून चिडवू लागले.

मि. अब्दुल करीम साहेबांचे वडील गेल्याच वर्षी निवर्तले होते. त्यांच्या मृत्यूसमयी अब्दुल करीम घरी नव्हते. मुलाचं तोंड पहावं यासाठी त्यांच्या वडलांनी त्यांचा बराच शोध घेतला. नंतर पुढं मि. अब्दुल करीम साहेबांच्या कानी आलं की, मरण्यापूर्वी एका शेजाऱ्याला उपदेश करताना त्यांचे वडील म्हणाले होते की, "स्वतःच्या पोराला उच्च शिक्षण देऊ नकोस. कारण अधिक शिक्षणामुळे मुलांना आईवडिलांबद्दल माया राहत नाही." हे ऐकून मि. अब्दुल करीम साहेबांना भयंकर राग आला होता. रागाच्या भरात ते हे विसरले की वडिलांनीच आपणाला उच्च शिक्षण दिलं होतं. ते रागानं म्हणाले, " अरे त्या गांवढळ माणसाला काय माहीत की, शिक्षण कशाला म्हणतात ते ! त्यांनी कधी अजिंठ्याची लेणी बघितली होती ? जगातला पहिला कथाकार कोण हे माहीत होतं त्यांना ? घाण्याच्या बैलाप्रमाणं

डोळ्यांवर पट्टी बांधून सारं जीवन जगत आला तो माणूस !" मि. अब्दुल करीम साहेबांना तेव्हापासून आपल्या आईबद्दल तिरस्कार वाटू लागला. राहून राहून ते विचार करीत की, या म्हाताऱ्या महाराजांपूर्वी काश्मीरचा बादशहा कोण होता ?

यामुळे मि. अब्दुल करीम साहेब सकाळीच घराबाहेर पडत आणि संध्याकाळी उशीरा परतत. दिवसादेखील ते लोकांपासून दूर राहत.

एका दिवशी त्यांनी वर्तमानपत्रात बातमी वाचली की, अमेरिकेने ॲटमबॉम्ब बनवला आहे. आणि हा बॉम्ब सर्व जगाला नष्ट करणारा आहे. तसे त्यांचे हात-पाय बधीर झाले. त्या दिवशी त्यांची तब्येत बिघडली आणि ते ऑफिसला देखील गेले नाहीत.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्या बॉम्बचा फोटो देखील आला. अमेरिकेनं त्याची समुद्रात चाचणी घेतली तशी सारा समुद्र ढवळून निघाला होता. या बातमीनं तर मि. अब्दुल करीम साहेबांची तब्येत आणखीच खराब झाली होती. जगाच्या एकंदर परिस्थितीची त्यांना कल्पना होती. त्यांना माहीत होतं की अमेरिका युद्धास टपलेली आहे. युद्ध केल्याशिवाय चैन नाही पडणार तिला. कारण अमेरिकेचं शासनच मुळी युद्धामुळे टिकून आहे. आणि दुसरं म्हणजे तिच्याकडं एक असं भयानक विनाशकारी अस्त्र आहे की सारं जग त्या योगे विध्वंसाच्या खाईत लोटलं जाऊ शकेल.

मि. अब्दुल करीम एम. ए., एल. एल. बी. साहेबांना स्वतःच्या जीवाची काळजी वाटू लागली. त्यांचे हातपाय लटलट कापू लागले. पोट बिघडलं. स्वभाव चिडचिडा झाला. येवढ्या तेवढ्यावरून ते वादावादी करू लागले. भांडायला उठू लागले. अंगणात पोरं दंगामस्ती करीत होती. मि. अब्दुल करीम साहेबांनी त्यांना पिटाळून लावलं. दूरवर देखील जर कुणी गुणगुणत असलं तरी मि अब्दुल करीम त्याला शिव्या बडबडत, " या बेवकूफ लोकांना कुठं माहिताय की उद्या सर्वांना मरावं लागणार आहे ते. लेको, एक जरी बाँब पडला ना, तर सगळ्यांचे जीव जातील !" मि. अब्दुल करीम आता सगळ्या जगालाच वैतागले होते.

एक दिवस त्यांची आई त्यांच्यासाठी कॉफी घेऊन आली. व्हरांडा ओलांडून आत येताना तिनं बघितलं की, अब्दुल करीम आपली मान गुडघ्यात खुपसून कसल्याशा विचारात गढले आहेत. ती थोडी घाबरली. हाय रे देवा, पोरगा आजारी–बिजारी तर नाही ना ? का नोकरीवरून काढून टाकलं ! का अजून काही भलतं सलतं झालं ? तिनं मि. अब्दुल करीमला कॉफीचा एक घोट घेण्याचा आग्रह केला. एवढ्यात एक बुलबुल कुठून तरी झेपावत आली आणि खिडकीवर बसून गुंजारव करू लागली. मि. अब्दुल करीम उठले आणि त्यांनी तिला उडवून लावलं,

" अरे तिनं काय तुझं घोडं मारलं ? का उठवलंस तिला ?" आईनं विचारलं, म्हणाली, " कदाचित आज कुणी पाहुणा येणारसं दिसतंय."

" हॅं-हॅं पाहुणा येणार ! अग आता लवकरच जग बुडणार आहे. मग येतील तुझे पाहुणे !"

" काय म्हणतोयस ?" आईनं काहीशा चकित मनानं त्याला विचारलं. आज इतक्या दिवसानंतर मि. अब्दुल करीम आपल्याशी मनमोकळं बोलला यामुळे ती जरा खूष झाली होती.

" खरं सांगतो आई ! आज युद्ध सुरू झालं की समजायचं उद्या जग संपलं. "

" ते कसं काय ? आजपर्यंत इतकी युद्धं झाली परंतु ज्यांनी ते सुरू केलं तेच लोक त्यात मेले. "

" तुला नाही माहित आई. आयुष्यभर तू सरळ सुतासारखं जगत आलीस. अगं अमेरिकेनं बॉम्ब बनवला आहे बॉम्ब. असा बॉम्ब की ज्यामुळं उभं जग बेचिराख होईल !"

" बॉम्ब बनवला म्हणून काय झालं ? जगातले लोक काय त्याचा स्फोट होऊ देणार आहेत ?" त्याची आई आत्मविश्वासाने म्हणाली. तसं मि. अब्दुल करीम हसले. म्हणाले, " बघा या दुनियेची अक्कल !"

तीन दिवस मि. अब्दुल करीम साहेबांनी काहीच खाल्लं पिल्लं नाही. घराची सर्व दारं-खिडक्या लावून ते विचार करत राहिले. सुस्कारे टाकीत राहिले. तिसऱ्या दिवशी पेपर वाचत असताना एखाद्या लहान मुलासारखे ओरडले, " आई ! अग आई !" त्यांची आई धावतच खोलीत आली. तिचा आनंद आता गगनात मावेनासा झाला होता. किती प्रेमानं हाक मारली होती तिच्या मुलानं ! तिनं बघितलं- मि. अब्दुल करीम मुग्ध बालकासारखा आनंदी दिसतोय.

" आई, तुला कसं कळलं ग की लोक अमेरिकेला बॉंब टाकू देणार नाहीत ते ?" मि. अब्दुल करीम साहेब भराभर पेपर वाचू लागले.

" अरे बाबा, मला माहिताय की मी तुझ्याइतकं जग पाहिलं नाही की त्याबद्दल काही ऐकलं नाही. पण हे केस काय चुना लावून पांढरे केलेत ?"

मि. अब्दुल करीम वर्तमानपत्रातील वैज्ञानिक, विचारवंत, साहित्यिक, श्रमिक आणि सामान्य माणसांची वक्तव्यं वाचत होते- की, ॲटमबॉंबला प्रतिबंध केला पाहिजे. त्यांना भास होऊ लागला की, वर्तमानपत्रातील अक्षरं हलताहेत . आकारानं फुगताहेत, रुंद होताहेत. उंच होताहेत. त्यांना ती अक्षरं माणसासारखी दिसू लागली. पांढऱ्या केसांची खेळणारी लहान मुलं ! एक साथ एका आवाजात जणू सगळेच ओरडताहेत, " ॲटमबॉंबला प्रतिबंध करा ! "

त्यांची दृष्टी धूसर झाली. डोकं गरगरू लागलं. वर्तमानपत्र फेकून देत ते उठले. बाहेर बघितलं, सूर्य बराच वर आला होता. रस्त्यावर गल्लीतली पोरं मस्ती करीत होती.

मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. बी. साहेबांनी ऐकलं की रसूल शिंप्याच्या

दुकानावर सगळे या निर्णयाप्रत पोचलेत की जो देश जगाची शांती नष्ट करेल तो शेवटी हार खाईलच, कारण जगातल्या सर्वच लोकांचा त्याला विरोध असेल. मि. अब्दुल करीम एम. ए., एल्. एल्. बी. साहेबांचे जणू डोळे उघडले. बऱ्याच दिव-सांनी त्यांना आज प्रकाश दिसला होता.

• •

Indian Institute of Advance Study
117043
9/12/04
SHIMLA

साहित्य अकादेमी भारत सरकार द्वारा १९५४ साली स्थापन झालेली 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ लेटर्स' आहे. ही एक स्वायत्त संस्था असून तिचे धोरण एका परिषदेद्वारा निर्णित होते. या परिषदेत विभिन्न भारतीय भाषा, राज्य व विद्यापीठे यांचे प्रतिनिधी असतात.

अकादेमीचा कार्यक्रम भारतीय भाषांतील साहित्यिक उपक्रमांचा समन्वय करणे व त्यांची वाढ करणे हा होय. एका भारतीय भाषेतील उत्तम साहित्याचे लोण अनुवादाद्वारा अन्य भाषांच्या वाचकापर्यंत पोचविणे हे तिचे उद्दिष्ट आहे.